दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –२७४ शनिवार,दि.०७ जुन २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-274 Saturday, Dt.07 June 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## सातारा वॉरियर्सच्या कर्णधारपदी बीड जिल्ह्याचा भूमिपुत्र सौरभ शिवाजी नवलेची निवड



बीड /राजयोग प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रीमियर लीगचा थरार ५ जून २०२५ पासून पुणे येथील इंटरनॅशनल स्टेडियम वर सुरू झाला आहे. या स्पर्धेत एकूण ६ टीम आहेत.त्यामध्ये सातारा वॉरियर्स या नवीन टीमचा या वर्षापासून समावेश झाला आहे.

(उर्वरीत पान २ वर)


# सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या : गुन्हा दाखल

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुक्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गीता या गावातील शुभांगी संतोष शिंदे या विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. ऑप्टिकलचे दुकान टाकण्यासाठी सासरच्या मंडळींनी माहेरावरून पैसे आणण्यासाठी छळ केल्याचा आरोप माहेरच्या लोकांनी केला आहे.

अंबाजोगाई व धारूर येथे ऑप्टिकलचे दुकान असताना तिसऱ्या दुकानासाठी वारंवार पैशाची मागणी केली जात होती. माहेरच्या लोकांनी पाच लाख रुपये देऊनही आणखी चार लाख रुपयांसाठी शुभांगी शिंदे हिचा छळ सुरू होता, असे पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. शुभांगी शिंदेंच्या मृतदेहाचे स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर तिच्या पार्थिवावर गिता येथे काल (गुरूवारी) रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले.या प्रकरणात शुभांगीच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरून पाच जणांविरोधात बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात पतीसह सासू – सासरे आणि नणंद यांनी हुंड्यासाठी छळ केल्याचं म्हटलं आहे.

दरम्यान या प्रकरणात पती संतोष शिंदे, सासरे विलास शिंदे,सासु सुमन शिंदे,ननंद सीमा शिंदे व पतीचे मित्र संदीप काचगुंडे यांच्या विरोधात भाऊ प्रदीप सोळंके याच्या फिर्यादीवरून बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील पती,सासू-सासरे,ननंद यांना पोलिसांनी अटक केली आहे. तर संदीप काचगुंडे हा अद्याप फरार असून त्याचा शोध बर्दापूर पोलीस घेत आहेत. या



प्रकरणामुळे गीता गावात हळहळ व्यक्त होत असून, सासरच्या त्रासामुळे आणखी एका विवाहितेचा जीव गेल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मृत महिलेच्या कुटुंबियांनी केली आहे.

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुक्यातील गीत्ता येथील शुभांगी संतोष शिंदे हिच्या आत्महत्या प्रकरणात मोठा खुलासा झाला आहे. या प्रकरणातील पाचवा आरोपी संदीप काचगुंडे हा भाजपचा धारूर तालुकाध्यक्ष असल्याचे समोर आले आहे. सद्यस्थितीत तो फरार असून, बर्दापूर पोलिस त्याचा शोध घेत आहेत.शुभांगी शिंदे हिने सासरच्या मंडळींच्या सातत्यपूर्ण छळाला कंटाळून राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली होती. शुभांगीच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून पती संतोष शिंदे, सासरे विलास शिंदे, सासू सुमन शिंदे, नणंद सीमा शिंदे आणि पतीचा मित्र संदीप काचगुंडे यांच्या विरोधात बर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पतीसह सासू, सासरे आणि नणंद या चौघांना पोलिसांनी अटक केली असून, शुक्रवारी दुपारी त्यांना न्यायालयात हजर केले जाणार आहे. मात्र संदीप काचगुंडे हा अद्याप फरार आहे. तो भाजपच्या धारूर तालुकाध्यक्षपदावर कार्यरत असल्यामुळे त्याच्या फरार होण्यात राजकीय पाठबळ आहे? असा संशय उपस्थित होत आहे.


# 'स्वाराती' त रेडियोलॉजीच्या पदव्यूत्तर ४ जागांना मान्यता

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील रेडियोलॉजी विभागात पदव्यूत्तर ४ जागांना मान्यता मिळाली आहे, अशी माहिती अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी दिली आहे. पदव्यूत्तरच्या ४ जागांना मान्यता मिळाल्याने रेडियोलॉजी विभागाला नवसंजीवनी प्राप्त झाली आहे. याचा फायदा रुग्णालयात येणाऱ्या गोरगरीब रुग्णांना होणार आहे.

गोरगरीब रुग्णांसाठी संजीवनी ठरलेल्या 'स्वाराती' रुग्णालयातील रेडियोलॉजी विभाग गेल्या कित्येक वर्षांपासून बंद पडला होता. या ठिकाणी असणाऱ्या पदव्यूत्तर जागा 'एमआरआय' आणि इतर सुविधा नसल्याने लॅप्स केल्या होत्या. याचा फटका सर्वसामान्य रुग्णांना बसत होता. रेडियोलॉजी विभाग पुन्हा सुरु करण्यासाठी 'स्वाराती' प्रशासन सातत्याने प्रयत्न करीत होते.

(उर्वरीत पान २ वर)



### रुग्णांना होणार फायदा

'स्वाराती' रुग्णालयातील रेडियोलॉजी विभागात पदव्यूत्तरच्या ४ जागांना मान्यता मिळाल्याने याचा फायदा गोरगरीब रुग्णांना होणार आहे. विभागातील 'एमआरआय', 'सिटी स्कॅन', सोनोग्राफीचे रिपोर्ट्स रुग्णांना तात्काळ मिळतील आणि यासाठी खाजगी रुग्णालयात जाण्याची गरज रुग्णांना पडणार नाही. पदव्यूत्तरच्या जागांमुळे 'स्वाराती' चा रेडियोलॉजी विभाग अधिक सक्षम होणार आहे.

# बँकेचे बनावट नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट व फॉर्म नंबर ३५ दाखल केल्याप्रकरणी

## अंबाजोगाई पोलिसात वाहन चालक व एका पीयूसी सेंटर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बँकेचे नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट व फॉर्म नंबर ३५ हे बनावट दस्तऐवज दाखल करून फसवणूक केल्याप्रकरणी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई पोलिसात वाहन चालक व एका पीयूसी सेंटर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याविषयी प्राप्त माहिती अशी की अंबाजोगाई तालुक्यातील सोमन वाडी येथील रहिवासी सौदागर दत्तू सोनवणे यांनी एम एच ४४ यु २९५३ हे वाहन चोरोमंडल इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड शाखा लातूर यांच्याकडून कर्ज काढून खरेदी केलेले असताना व या कर्जाची परतफेड न करता आहे या वाहनावर चोरोमंडल इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड शाखा लातूर यांचा बोजा असताना आरोपी सौदागर दत्तू सोनवणे रा. सोमणवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड अ.क्र. २) सलीम शेख (सलीम पीयूसी) पुर्ण नांव व पत्ता माहित नाही यांनी २० जानेवारी २०२५ रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड. येथे वाहन क्रमांक चक४४.ण.२९५३ या वाहना संदर्भातील नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट व फॉर्म नंबर ३५ हे बनावट दस्तऐवज तयार करुन त्यावर खोटी सही व शिक्का मारून ते दस्तऐवज बनावट असल्याचे माहित असताना देखील खरे दस्तऐवज असल्याचे भासवून उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई या ठिकाणी सादर केले व सौदागर दत्तू सोनवणे व सलीम शेख यांनी स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वाहनावरील उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई यांचे कडून कर्ज बोजा व परवाना (झशीाळीं) उतरवून

सदरचे वाहन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे या

(उर्वरीत पान २ वर)

## शिवस्वराज्य आभिषेक दिनाला ग्रामसेवकाची दांडी



### कारवाई करण्याची मागणी......!

परतूर/प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा जागर पुन्हा मराठी मनांमनात व्हावा, जगभरात जेथे जेथे मराठी माणूस आहे तेथे तेथे या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार तसेच त्यांच्याबद्दलची माहिती पोहोचावी, हा या मागील उद्देश ठेऊन

(उर्वरीत पान २ वर)

# १६ वर्षाच्या मुलीला फुस लावून पळविले

## पोलीसांनी प्रकरण दाबून आरोपीला सोडून दिले

बीड ।प्रतिनिधी

आसरढव तालुका धारुर येथील एका १६ वर्षाच्या मुलीला आरोपीने फुस लावून पळवुन नेले. पुढे संभाजीनगर येथून बीड ग्रामीण पोलीसांनी आरोपी व पिडीतेस बीड येथे आणले तेथे आरोपीवर पोक्सो अंर्तत गुन्हा दाखल न करता अपहरणाचा गुन्हा नोंद केला तसेच पोलीसांनी पिडीतेच्या घरच्यांना दमदाटी करत प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप पिडीतेच्या पालकांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

पिडीता व आईसह आसरढव तालुका धारुर येथे राहते याच गावातील आरोपी नामे शुभम बाबुराव काचगुंडे हा सातत्याने पिडीतेला त्रास देत होता म्हणून पिडीतेच्या घरच्यांनी तिला राजुरी ता.बीड येथे मावशीच्या घरी ठेवले होते परंतू आरोपीने तिला तेथून फुस लावून पळविले.त्यानंतर १७ दिवसाचा कालावधी लोटल्यानंतर पुढे दि.२७ मे रोजी पिडीतेच्या घरी पोलीसांचा फोन आला की तुमची मुलगी व आरोपी शुभम काचगुंडे यास पकडून आणलेले आहे. तुम्ही पोलीस स्टेशनला या असे सांगितले त्यावेळी आरोपीवर बीएनएस कलम

(उर्वरीत पान २ वर)

# नायगांव ते इस्थळ रस्त्याची झाली चाळणी प्रवाशी त्रस्त

केज/प्रतिनिधी

केजतालुक्यातील अनेक रस्त्यांची सुधारणा होत असताना काही रस्त्यांची मात्र दुरवस्था झाली आहे. तर काही ठिकाणी होणारी कामे हीअडचण नसून खोळंबा अशी स्थिती झाली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की,तालुक्यातील मौजे नायगांव ते इस्थळ या रस्त्याची पूर्णतः चाळणी झालेली असून त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे.त्यात नायगाव ते सौंदना या गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून रखडलेले आहे.गुत्तेदाराने त्या रस्त्याचे बी.बी.एम पर्यंतचे काम करून

(उर्वरीत पान २ वर)



## रखडलेल्या रस्ते कामासाठी ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात

# बीड जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. ७ जून २०२५ रोजी मुस्लीम धर्मीय लोकांचा पवित्र सण बकरी ईद व तिथीप्रमाणे छत्रपती संभाजी महाराज यांची पुण्यतिथी एकाच दिवशी होत आहे. तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागणीसाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यदी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक ६ जून २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. २० जून २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही

(उर्वरीत पान २ वर)

# बीडमध्ये उभारणार सहकार संकुल; १४ कोटी ९८ लाखांची प्रशासकीय मान्यता

बीड (प्रतिनिधी)

दि.६ : बीड शहरातील नगर भूमापन क्र.१७९९ या मालकीच्या जागेवर 'सहकार संकुल' इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे १४ कोटी ९८ लाख रुपये इतक्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाकडून बुधवारी (दि.४) प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय व इतर सहकारी संस्थांच्या क्षेत्रीय कार्यालयांना

(उर्वरीत पान २ वर)

## युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार





# छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त शिवप्रेमीच्या वतीने विनम्र अभिवादन

## शिवसेना जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांच्यावतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी मोफत बियाणे वाटप

बीड ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त शिवतीर्थ येथे शिवप्रेमीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने व हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या ब्रीदवाक्य प्रमाणे शिवसेनेच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी शेतकऱ्यांना मोफत बी बियाणे वाटप करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिना निमित्त छत्रपती शिवाजी महाराज स्मारक शिवतीर्थ येथे बीड जिल्ह्यातील शिव प्रेमींच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी मोफत बियाणाचे वाटप जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम,डॉक्टर प्रफुल पाटील,बुलंद छावाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर, नारायण गवते, राष्ट्रीय छावाचे जिल्हाध्यक्ष युवराज मस्के,ॲड विनायकराव जाधव, गोपाळ धांडे, मधुकर धांडे, सामाजिक कार्यकर्ते पत्रकार अशोक सुखवसे, संजय गोडसे, पंजाबराव येडे, बापूसाहेब शिंदे, संतोष डोंगरे महाराज, श्रीकांत बागलाने, सुरेश ढास,आजिनाथ आदमाने,पंकज बाहेगव्हाणकर सतीश परदेशी राजू हरकुडे गणेश तिपाले दिलीप पवार राहुल जामकर यांच्या हस्ते बियाणांची वाटप करण्यात आले. यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी व शिवप्रेमी उपस्थित होते.



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# बेपर्वाईचे बळी

इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) विजेत्या बेंगळुरू संघाच्या स्वागतासाठी जमलेल्या गर्दीत चेंगरून ११ जणांचे बळी जाण्याची घटना हे यंत्रणांपासून चाहत्यांपर्यंत प्रत्येक स्तरावरील बेपर्वाईचे निदर्शक आहे. माणसाच्या जीवाला किडामुंगीइतकेही मोल नाही, हेच भीषण वास्तव यातून समोर येते. विजयाच्या जल्लोषात भान विसरून हजारोंच्या संख्येने जमलेल्या चाहत्यांच्या झुंडी, या गर्दीचे व्यवस्थापन करण्यात सपशेल अपयशी ठरलेल्या यंत्रणा आणि मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यासह कर्नाटकातील कारभाऱ्यांचा विजेत्यांसोबत चमकोगिरीचा अट्टहास असे अनेक घटक या दुर्घटनेला जबाबदार आहेत.

तब्बल १८ वर्षांनी आयपीएल जिंकल्याने बेंगळुरू संघाच्या चाहत्यांच्या आनंदाला भरते येणे साहजिकच होते; त्यानिमित्त बेंगळुरूत परतलेल्या संघाची मिरवणूक आणि सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. मात्र, आधीच वाहतूक कोंडीचा सामना करणाऱ्या शहरात पोलिसांच्या विरोधामुळे रस्त्यावरील मिरवणूक रद्द करण्यात आली. त्यामुळे मिरवणुकीसाठी जमलेले चाहतेही स्टेडियमकडे आल्याने तेथील आधीच्या गर्दीत भरच पडली. सत्कार कार्यक्रमाला 'निमंत्रितांनाच प्रवेश', 'तिकिटविक्री' आणि 'प्रथम येणाऱ्यास प्रवेश' असा संभ्रम अखेरपर्यंत कायम होता. सुमारे ३५ हजार जणांची क्षमता असलेल्या स्टेडियम परिसरात तीन लाखांहून अधिक नागरिक जमल्याने प्रवेशद्वार बंद करून ठेवण्याचे एकमेव 'नियोजन' यंत्रणांच्या हाती उरले. त्यातच गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केल्याने नागरिक पळत सुटले आणि चेंगराचेंगरी झाली. कर्नाटक सरकारने झाल्या प्रकाराच्या चौकशीची घोषणा आणि दहा लाख रुपयांची मदत जाहीर केली असली, तरी त्यातून आपण सगळेच काय धडा घेणार, हा प्रश्नच आहे.

क्रिकेट, चित्रपट, धर्म आणि राजकारण यांचा अतिरेकी पगडा नागरिकांना कसे बेभान बनवितो आणि त्याचे परिणाम किती भीषण होऊ शकतात, याचे हे आणखी एक उदाहरण. सर्व क्षेत्रांमध्ये शिरलेल्या बाजारीकरणाने निर्माण होणाऱ्या खऱ्या-खोट्या ईर्षा नागरिकांना अधिकच बेभान बनवतात. असल्याच बेभान झुंडींमुळे याआधीही अनेक शहरांमध्ये व्यवस्था कोलमडून पडल्याचे दिसून आले. यापूर्वीही मुंबईत विश्वविजेत्या भारतीय संघाच्या स्वागतानिमित्त जमलेल्या अलोट गर्दीने काळजाचा ठोका चुकला होता. गेल्या काही काळात गर्दी नियंत्रणाबाहेर गेल्याने चेंगराचेंगरीचे अनेक प्रकार घडले आहेत. प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्यात गर्दीत ५०हून अधिक जणांचे बळी गेले; तसेच दिल्ली रेल्वे स्थानकातही असाच प्रकार घडला.

तेलुगू सुपरस्टार अल्लू अर्जुनच्याचित्रपटाच्या खेळात चाहत्यांना प्राण गमवावा लागला. काही वर्षांपूर्वी मांढरदेव येथे घडलेली चेंगराचेंगरीची घटना अजूनही स्मृतींमध्ये आहे. नुकतीच पुण्यात एका चित्रपटाच्या प्रमोशननिमित्त आलेल्या तारे-तारकांना पाहण्यासाठी जमलेली गर्दी आवरण्यासाठी अक्षयकुमारला हात जोडून विनवणी करण्याची वेळ आली. त्यामुळे पूर्वीच्या घटनांमधून आपण काहीच बोध घेत नाही, हे वास्तव समोर येते. बड्याबड्या नेत्यांनाही विराट सभा-'रोड शो'चा मोह आवरत नाही. मात्र, या गर्दीच्या व्यवस्थापनासाठी कोणतीही प्रभावी कार्यपद्धती विकसित करण्यात आपण सारेच अपयशी ठरलो आहोत, हे गर्दी जमवणाऱ्या आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यात सामील होऊन या वेडाचाराला हातभार लावणाऱ्या प्रत्येकाला मान्य करावे लागेल.

# आष्टीत माजी आ.भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली भव्य तिरंगा रॅली संपन्न

## पाकिस्तानने भारताची बरोबरी करू नये,भारतीय सैन्यामध्ये मोठी ताकद - माजी आ.भीमराव धोंडे




आष्टी (प्रतिनिधी)

पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये भारतातील लोकांना मारले आहे. भारताने पाकिस्तानवर हल्ला केला नसून अतिरेकी कॅम्प उध्वस्त केले आहेत. भारतीय सैन्यामध्ये मोठे शक्तीशाली शस्त्र असून एकाच वेळी शंभर ड्रोनवर हल्ला करू शकेल असे शस्त्र असल्याने भारत हा शक्तिशाली देश असून पाकिस्तानने भारताची बरोबरी करू नये. आपल्या मतदार संघतील सर्वात जास्त सैनिक हे देशसेवेमध्ये कार्यरत असून शेतकऱ्यांची मुलेच जास्त भारतीया सेनेत आहेत. जवानांनी दाखवलेल्या साहसाला आणि धैर्याला सलाम आहे. पाकिस्तानने भारताची बरोबरी करू नये, भारतीय सैन्यामध्ये मोठी ताकद आहे असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले.आष्टी शहरात माजी आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली होती. या रलीनंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या सभेत ते मार्गदर्शन करताना बोलत होते.यावेळी लालासाहेब कुमकर, बाळासाहेब पवार, किशोर खोले, माऊली पानसंबळ, अशोक सव्वासे, दिलीप म्हस्के फौजी, भगत फौजी, गळगटे फौजी, सतीशमामा झगडे, वर्षा माळी, बाळासाहेब वाघुले, काकासाहेब लांबरुड, पांडुरंग गावडे, अंकुश मुंढे, विठ्ठल लांडगे, आण्णासाहेब लांबडे, झुंबर चव्हाण, गौतम सावंत, संभाजी दहातोंडे, बबन औटे, सोपान गाडे, चंद्रशेखर साके, गोरक्ष तावरे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी त्रिदल सैनिक संघटनेचे मेजर श्रीराम माने, पांडुरंग नागरगोजे, अशोक साळवे, नियामत बेग, रामराव खेडकर, अजयदादा धोंडे यांचे भाषणे झाली. यावेळी माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, भारतीय सैनिकांनी जम्मू काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदुर राबवत शत्रू राष्ट्र असलेल्या पाकिस्तानवर एअरस्ट्राइक करत प्रत्युत्तर देऊन अनेक दहशतवादी अड्डे उध्वस्त केले. ऑपरेशन सिंदुर यशस्वी केल्याबद्दल भारतीय सैनिकांच्या समर्थनार्थ आष्टीत तिरंगा रॅली काढून सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना केले. भारत हा जगाला ज्ञान देण्याचे काम करत असून अनेक इंजिनियर, डॉक्टर दुसऱ्या देशामध्ये चांगला प्रकारे काम करत आहेत. देशात शेतकऱ्यांनी ही मोठी प्रगती केली आहे. जेवढा माल पिकतो आहे ते ठेवण्यासाठी जागा देखील नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणावर शेतकरीही विविध तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतीमध्ये भरघोस उत्पादन मिळवत आहेत. शेतकरी मोठ्या प्रमाणावर कष्ट करतात. त्यामुळे त्यांचे लढण्याचे मनोबल वाढलेले असते. सैन्यामध्ये शेतकऱ्यांच्या मुलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. लढण्याची त्यांच्यामध्ये कष्ट करून मोठी ताकद निर्माण झाली आहे. सैन्यांमध्ये देखीलसुद्धा आपल्याच आष्टी मतदार संघातील मुलांची संख्या जास्त आहे. पाकिस्तानने भारताची बरोबरी करू नये. भारत हा खूप शक्तिशाली देश झाला असून पहिल्यासारखा आपला भारत राहिलेला नाही. आपल्याकडे एकच ब्रह्मस्त्र असे आहे की दुश्मन असलेल्या देशाचे व अतिरेक्यांचे १०० ड्रोन एकाच वेळेस पाडण्याची ताकद या शस्त्रामध्ये असून भारतीय सैन्यामध्ये मोठी ताकद आहे. लोकसंख्येबाबत चीनलाही भारताने मागे टाकले असून तरुणांचा देश म्हणूनही भारताची ओळख आहे. ५० पेक्षा अधिक देशांना अन्नधान्य पुरवण्याचे काम हा भारत देश करत आहे. भारताने अतिरेकी हल्ले उध्वस्त केले, अतिरेक्यांचे नेस्तनाबूत केल्याने भारतीय सैन्यांचे व त्यांच्या शौर्याला सलाम करून शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली. माजी आ. धोंडे यांच्या संपर्क कार्यालयापासून सकाळी ११ वाजता राष्ट्रगिताने रॅलीला सुरुवात झाली व शहरातील प्रमुख मार्गावरून तिरंगा रॅली झाली. आष्टी शहरातून एक किलोमीटर तिरंगा ध्वज हातात घेऊन निघालेल्या रॅलीने आष्टी शहर तिरंगामय झाले होते. भारत माता की जय, या जयघोषाने आष्टी शहर दणाणले होते. दभक्तीपर गाणे व तिरंगामय वातावरणाने शहरात देशभक्तीला उधाण आले होते. ही तिरंगा रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, शनि चौक, कमान वेस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, म. फुले चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकात सभेने समारोप करण्यात आला.

यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम, हम सब भारतीय है, भारतीय सैन्यदलाचा विजय असो, वीर जवान तुझे सलाम अशा घोषणा देऊन आष्टी मतदारसंघातील सर्व हिंदू - मुस्लिम देशप्रेमी नागरिक सैदव सैनिकांसोबत आहोत हे दाखवून दिले. तिरंगा युवकांच्या हातात दिसून आला. भारतीय सैन्य जिंदाबाद, वंदे मातरम, भारत माता की जय अशा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. प्रत्येकाच्या हातातील तिरंगे ध्वज सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या रॅलीमध्ये युवा नेते अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे, अशोक साळवे, ड. रत्नदीप निकाळजे, आजिनाथ गवळी, पांडुरंग नागरगोजे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, उत्तम बोडखे, अस्ताक शेख, सरपंच सावता ससाणे, दादासाहेब जगताप, ज्ञानेश्वर वाघ, सरपंच अभय गर्जे, संभाजी जगताप, चेअरमन अरुण सायकड, आण्णासाहेब लांबडे, बबन औटे, बाबासाहेब ससाणे, गौतम ससाणे, बबनराव सांगळे, हादी शेख, सदाभाऊ दिंडे, शेख आज्जुभाई, ड. विधाते पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




आष्टी येथील स्वराज ट्रॅक्टर्सचे सुप्रसिद्ध सावळेश्वर शोरुम येथून स्वराज - ७२४ ची खरेदी करतांना शेतीनिष्ठ शेतकरी श्री. आजिनाथ राख समवेत डावीकडून श्री. दशरथ राख, श्री. पांडुरंग राख, श्री. नवनाथ राख, सरपंच श्री. विठ्ठल राख, शोरुम चे मालक श्री. रमेश आजबे, श्री. राजेंद्र लाड, श्री. श्रीधर राख, श्री. माणिक वाल्हेकर, श्री. विशाल राख दिसत आहेत.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण आणि बीजारोपण




आष्टी (प्रतिनिधी)

कडा येथील जीवदया फाऊंडेशन टीम तसेच निसर्ग व प्राणी मित्रांनी जागतिक पर्यावरण दिवशी वृक्षारोपण करण्याचा संकल्प करून कडा - साबलखेड, रेणुका माता मंदिर या डोंगर परिसरात विविध प्रकारचे वृक्ष लागवड करून हा दिवस साजरा केला. वड, पिंपळ, लिंब, सिसम, चिंच, रामफळ, सिताफळ, आवळा अशा प्रकारचे झाडे लावले गेले.

यासाठी प्राणीमित्र नितीन आळकुटे, संतोष थोरवे, प्रविण कर्डिले, मल्हारी पाचपुते, गणेश पवळ, शैलेश मिश्रा, प्रदिप डोरले, मुकेश गांधी, शिवराज खेंगरे सामाजिक वनीकरण विभागाचे अमोल घोडके, गव्हाणे यांनी वृक्षारोपणास श्रमदान करत सहकार्य केले. या लावलेल्या झाडांची देखभाल कडा येथील जीवदया फाऊंडेशन टीम करणार आहे. कडा येथील जीवदया फाऊंडेशन टीम ही पशूपक्षी, वन्यजीव निसर्ग रक्षणासाठी नेहमी तत्पर असते, वनातील जीवांसाठी विविध माळारानावर वनात पाणवठे बांधले आहेत, यासाठी लोकसहभाग मिळत आहे.

## पान १ वरून...

### 'स्वाराती' त....

मध्यंतरीच्या काळात तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुडे यांनी 'स्वाराती' प्रशासनाला 'एमआरआय' मशीन उपलब्ध करुन दिली होती. त्यामुळे लवकरचं 'स्वाराती' चा रेडियोलॉजी विभाग पुन्हा सुरु होईल, अशी आशा सर्वांनाच वाटत होती. 'स्वाराती' प्रशासनाने ही 'एमसीआय' च्या मार्गदर्शक सूचनेनुसार विभागातील विभागप्रमुखाचे पद आणि इतर त्रुटी सातत्याने प्रयत्न करुन दूर केल्या. 'एमआरआय', 'सिटी स्कॅन', सोनोग्राफी यासह अन्य सुविधा विभागात कार्यान्वित असल्याने अखेर रेडियोलॉजी विभागात पदव्यूत्तरच्या ४ जागांना मान्यता मिळाली आहे.

### १६ वर्षाच्या मुलीला ....

१३७(२) अंतर्गतचा अपहरणाच्या गुन्ह्याचा कलम लावून पिडीतेच्या घरचे अशिक्षित आहेत याचा फायदा घेवून आरोपीच्या नातेवाईकांनी व पोलीसांनी कोर्या कागदावर सह्या घेवून प्रकरण जास्त वाढवू नका हे लोक तुम्हाला गावात राहू देणार नाहीत अशी धमकी दिली व प्रकरण जागेवरच दाबले त्यानंतर पोलीस अधिक्षक यांच्या समोर हा प्रकार गेल्यावर देखील कोणतीही कार्यवाही झालेली नाही त्यामुळे आरोपी व पोलीसांची मिलीभगत असून त्या दिवशी पोलीस स्टेशनमध्ये कायम झाले हे पाहण्यासाठी दि.२७ मे २०२५ रोजी सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी पिडीतेच्या घरच्यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे केली आहे. तसेच आरोपीविरुध्द मुलीला पळवून नेवून अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करणे तसेच पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करणे आणि ग्रामीण पोलीसचे सदर प्रकरणातील तपासी अधिकारी यांच्या विरोधात अॅट्रॉसिटी कलम ४ प्रमाणे गुन्हा दाखल करावा अन्यथा मंगळवार दि.१०/०६/२०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याचे पिडीतेच्या घरच्यांनी जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.

### शिवस्वराज्य ...

राज्य सरकार कडून ०६ जून रोजी शिव स्वराज्यआभिषेक दिवस साजरा केला जातो पण बऱ्याच शासकीय निमशासकीय कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी याला बगल दिल्या जात असल्याचे आज ही पाहायला मिळत आहे

तालुक्यातील वरफळ येथील ग्रामपंचायत कार्यालयात सुद्धा असच काहीस घडलं आहे शिवस्वराज्यआभिषेक दिन या रोजी ग्रामसेवक श्री. सतीश शेवाळे गैरहजर होते यामुळे सर्व शिवप्रेमी मध्ये रोष व्यक्त केला जात याबाबत स्थानिक युवकांनी त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.ग्रामसेवक शेवाळे हे मेहनीच गावात गैरहजर राहतात पण एखाद्या महत्वाच्या दिनाला सुद्धा गैरहजर राहिल्याने जास्तीचा रोष स्थानिकामध्ये दिसून आला आहे याबाबत वरिष्ठ कार्यालयाला सामाजिक कार्यकर्ते तक्रार करणार असल्याचेही यावेळी स्थानिक नागरिकांनी सांगितले.

### बीडमध्ये उभारणार...

आता एकाच छताखाली आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बीडमध्ये सध्या जिल्हा उपनिबंधक कार्यालय हे जालना रोडवरील सहकार शक्ती इमारतीत भाडेतत्त्वावर कार्यरत आहे. यासाठी मोठा शासकीय निधी वार्षिक भाड्यापोटी खर्ची पडतो. हा अनावश्यक खर्च टाळण्यासाठी आणि कार्यप्रणाली अधिक सुसुत्र करण्यासाठी सर्व सहकारी कार्यालये एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या सहकार संकुलामुळे शासकीय खर्च वाचणार असून नागरिकांसाठी एकाच ठिकाणी सेवा उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, अनेक वर्षांपासूनचा सहकार संकुलाचा प्रश्न मार्गी लागला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

### बँकेचे बनावट नो .....

कार्यालयात दुसऱ्या व्यक्तीस विक्री करुन शासनाची व बँक फायनान्स कंपनीची फसवणूक केली. ही फसवणूक लक्षात येताच अंबाजोगाई येथील उप प्रादेशिक कार्यालयातील अशोक सयाराम बोलचेटवार वय ३२ वर्ष यांच्या फिर्यादी वरून सौदागर दत्तू सोनवणे रा. सोमणवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड व सलीम शेख (सलीम पीयूसी चालक) यांच्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलिसात गुरनं २८३/

## पान १ वरून...

२०२५ कलम ३१८ (४),३३६ (३), ३४०(२),३३६(२),३१६(२),३४१(१),३(५) इछ्ड. नुसार गुन्हा दाखल करण्यात आल्या असून पुढील तपास पोलीस निरीक्षक जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आह आहे.

### नायगांव ते इस्थळ...

सोडून दिले आहे.काही ठिकाणी तर काम होण्या अगोदरच गुडघा भर खड्डे पडले आहेत. बी.बी.एम करून सोडल्याने रस्त्यावरील खडी उघडी पडल्याने प्रवास करताना प्रवास करताना चांगलीच दमछाक होत आहे.

तसेच सौंदना ते इस्थळ हा रस्ता म्हणजेखड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा अशी अवस्था झाली आहे.अनेक वर्षापासून हा रस्ता याच अवस्थेत आहे.या खड्डेमय रस्त्या वरून जातानातारेवरची कसरत करावी लागत आहे.नायगाव ते इस्थळ या रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण न झाल्यास रस्त्याच्या रखडलेल्या कामासाठी सौंदना, नायगाव येथील ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात असल्याचे ग्रामस्थांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

### बीड जिल्ह्यामध्ये ...

जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

### सातारा वॉरियर्सच्या...

छत्रपती संभाजी किंगस हि टीम रद्द झाल्याने नवीन सातारा वॉरियर्स नवीन टीम MPL मध्ये सहभागी झाली असून संघाचे कर्णधार म्हणून श्री अजय शिर्के यांची ज्ञशवरपरलश क्रिकेट अकॅडमीचा विकेटकिपर, बॅटमॅन सौरभ नवलेची निवड झाली आहे.

बीड जिल्ह्याचा हा भूमिपुत्र जिल्ह्याचे नाव जागतिक पातळीवर गाजवत आहे.त्याचा सार्थ अभिमान सर्व क्रिकेट प्रेमींना आहे.सौरभ नवले हा रणजी खेळाडू २०२२ पासून महाराष्ट्रच्या रणजी संघाकडून खेळत आहे.सौरभ नवले हा पोस्टल संघटनेचे महाराष्ट आणि गोवा राज्याचे उपाध्यक्ष श्री शिवाजी नवले यांचा मुलगा आहे.सौरभच्या निवडी बद्दल सर्व क्रिकेट प्रेमींनी अभिनंदन आणि त्याच्या भावी कारकिर्दीसाठी शुभेच्या दिल्या आहेत.त्याची लवकर आयपीएल मध्ये निवड होवो अश्या शुभेच्छा दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने संपादक वैभव स्वामी यांनी दिल्या आहेत.

# अंबाजोगाई नगरपरिषदेने राबविला 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम




अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगरपरिषदेने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमातून जागतिक पर्यावरण दिनी सर्व्हे नंबर-१७ मध्ये विविध प्रजातींच्या ४० रोपांचे वृक्षारोपण केले. वर्षभर 'एक पेड माँ के नाम' उपक्रम राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून वृक्ष संवर्धनास चालना मिळणार असून व वृक्ष संगोपन ही करण्यात येणार आहे.

येथील नगरपरिषद अंबाजोगाई (जि.बीड) यांच्या मार्फत गुरूवार, दिनांक ५ जुन २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अमृत व दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नगरी उपजीविका अभियान (डीएवाय - एनयुएलएम) कृतीसंगम उपक्रमांतर्गत सर्वे नंबर-१७ या ठिकाणी 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी अंबाजोगाई नगरपरिषदचे, कार्यालयीन अधिक्षक शेख इफ्तेखार, सय्यद अन्वर, शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे, शहर समन्वयक शेख समीरोद्दीन, नगररचनाकार ज्ञानेश्वर पोटे, शहर अभियंता किशोर मुंडे, धनंजय चव्हाण, लखन ओहाळ, स्वच्छता विभागाचे राजकुमार जोगदंड, सुपरवाझयर मल्हारी जोगदंड व इतर कर्मचारी तसेच शहरस्तर संघाच्या अध्यक्षा श्रीमती रोहिणी कडेकर, सिआरपी निर्गुण हावळे, सीमा खतीब, मनीषा वाघमारे, तसेच आनंदी, आदिशक्ती, आईसाहेब, प्रगती इत्यादी स्वयंसहायता महिला बचत गटांतील सदस्यांनी उत्स्फूर्तपणे वृक्षारोपण केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्वच्छता विभागाचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. शहरातील विविध प्रभागांमध्ये तसेच शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालयातील परिसरामध्ये वृक्षारोपण करण्याची परवानगी दिल्यास 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात येणार आहे. सदरील वृक्षारोपण केलेल्या वृक्ष रोपांचे एक वर्ष कालावधीसाठी संगोपन करण्याची जबाबदारी देखील स्विकारणार आहेत. अंबाजोगाई नगरपरिषदेने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमातून जागतिक पर्यावरण दिनी सर्व्हे नंबर-१७ मध्ये विविध प्रजातींच्या ४० रोपांचे वृक्षारोपण केले. लागवड केलेल्या पर्यावरणपूरक लिंब, आपटा, चिंच, पिंपळ, करंज, वड इत्यादींचा समावेश आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे यांनी सांगितले आहे की, अंबाजोगाई नगरपरिषदेने सन्माननीय मुख्याधिकारी प्रियांका टोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व सुचनेनुसार 'एक पेड माँ के नाम' हे अभियान सुरू केले आहे, ज्याचा उद्देश पर्यावरण संवर्धनासाठी समाजात जागरूकता पसरवणे आणि मातांबद्दल आदर व्यक्त करणे आहे. या मोहिमेअंतर्गत, आईच्या नांवाने एक झाड लावले जाते, जे पर्यावरणाचे रक्षण करते आणि चिरस्थायी स्मृती निर्माण करते. या मोहिमेचा उद्देश : पर्यावरण संवर्धन व्हावे, झाडे लावून, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि निरोगी भविष्य निर्माण करणे हे या अभियानाचे खरे उद्दिष्ट आहे. आईंचा आदर : आपल्या आईच्या नांवाने झाडे लावून, मानवी जीवनाचे पालनपोषण करणाऱ्या मातांबद्दल आदर व्यक्त केला जातो. या अभियानात समुदाय सहभाग महत्त्वाचा आहे. स्थानिक समुदाय आणि विविध भागधारकांना सहभागी करून मोठ्या प्रमाणात सहभाग वाढविणे हे या मोहिमेचे खरे उद्दिष्ट आहे. हे अभियान मातांचे योगदान आणि महत्त्व अधोरेखित करते. हे अभियान देशाच्या शाश्वत विकासाच्या शोधाशी सुसंगत आहे, जी पर्यावरण आणि सामाजिक विकासामध्ये संतुलन स्थापित करते. या अभियानाअंतर्गत विविध प्रकारची झाडे लावली जातात, ज्यामुळे हिरवळ वाढते. या अभियानाद्वारे, लोकांना पर्यावरण संरक्षणाबद्दल शिक्षित केले जाते आणि झाडे लावण्यास प्रोत्साहित केले जाते. सदरील अभियानाच्या यशस्वितेसाठी मुख्याधिकारी प्रियांका टोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई नगरपरिषदेचे सर्व अधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी वर्ग, स्वच्छता विभागाचे कामगार बंधू-भगिनी आणि शहरातील विविध महिला बचत गट यांनी पुढाकार घेतला आहे. अशी माहिती शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे यांनी दिली आहे.

# क्या हुआ तेरा वादाचा महायुतीला विसर

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सावळदबारा शाखेकडून निवेदन

सावळदबारा ।प्रतिनिधी

महायुती सत्तेवर येण्यापूर्वी गोरगरीब शेतकरी ला लाडक्या बहिणींना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न केल्याबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सावळदबारा तालुक्याचे तहसीलदार यांना निवेदन देऊन सरकारच्या फसवेगिरी विरुद्ध क्या हुआ तेरा वादा असे गाणे म्हणत शिवसैनिकांनी सरकारचा निषेध करत निवेदन दिले.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील शिवसेना भवन दादर येथे राज्यातील सर्व जिल्हाप्रमुख व तालुकाप्रमुख यांची एक महत्त्वाची बैठक घेऊन महायुतीने दिलेले आश्वासनाचे पूर्तता न केल्याबद्दल क्या हुआ तेरा वादा हा उपक्रम घेऊन तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये व तालुका स्तरावर निवेदन देण्याचे कळवले.त्यानुसार तालुक्यातील तालुका प्रमुख व शहरातील शहरप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील ग्रामपंचायतचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेचे पक्षाचे पदाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये तसेच तालुक्यातील तहसील कार्यालयामध्ये जाऊन दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी यासाठी महायुती सरकारच्या विरोधात निवेदन सादर करण्यात आले. राज्य सरकार अस्तित्वात येण्यापूर्वी महायुतीने गोरगरीब शेतकऱ्यांना शेतकरी कर्जमुक्त करू तसेच लाडके बहीण ला पंधराशे रुपयांच्या ऐवजी २१०० रुपये प्रति महिना देऊ ही आश्वासन दिली होती. मात्र ही आश्वासन धूळ खात पडली आहेत.सरकारचे डोके ठिकाणावर आणण्यासाठी पक्ष आदेशानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेचे तालुकाप्रमुख दिलीप मचे यांच्या नेतृत्वाखाली सोयगाव तहसील कार्यालयामध्ये जाऊन संजय गांधी निराधार योजनेची नायब तहसीलदार प्रतापसिंग बोहरी यांना निवेदन देण्यात आले.यावेळी तालुकाप्रमुख दिलीप मचे, तालुका संघटक गुलाबरावजी कोलते अण्णा, शहर प्रमुख रविंद्र काटोले, उपशहर प्रमुख सुरेश पुसे, उपशहर प्रमुख दीपक बागुल, धोंडू पाटील, शंकर इंगळे, चंद्रास आप्पा रोकडे, योगेश रोकडे, विठ्ठल भारुडे, पांडुरंग भारुडे, संजय सपकाळे, शेख मुनाफ मामा, हर्षल मानकर, दिना परदेशी, रणजीत परदेशी, ओम काटोले, किरण बावस्कर,



दीनानाथ परदेशी, अमजद भाई पठाण, नजीर दादा पठाण यांच्यासह तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेचे पदाधिकारी सोयगाव तहसील कार्यालय येथे निवेदन देण्यात हजर होते. तालुक्यातील विविध ग्रामपंचायत मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेचे पदाधिकारी तथा ग्रामपंचायत सदस्य सरपंच उपसरपंच यांनी महिला आघाडीचे कार्यकर्त्यांनी ग्रामसेवकांना निवेदन सादर केले.

# ग्रामविकास अधिकारी के.के.आगाशे यांचा निरोप समारंभ संपन्न

## के.के.आगाशे साहेब यांच्यासारखे ग्रामविकास अधिकारी, गावकऱ्यांच्या सेवेसाठी नशिबाने मिळतात - सरपंच नंदकुमार मिसाळ



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे कोल्हेवाडी येथील ग्राम विकास अधिकारी श्री. काकासाहेब कोंडीबा आगाशे हे दि.६ जून रोजी बदली झाल्याने पदमुक्त झाले आहेत. के.के.आगाशे हे कोल्हेवाडी ग्रामपंचायत येथे गेली दीड वर्षा पासून कार्यरत होते. तरी त्यांच्या जागी श्री. शंकर लक्ष्मण हेडगिरे यांनी ग्रामविकास अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला आहे.कर्तव्यदक्ष व प्रेमळ स्वभाव ही त्यांची ख्याती आहे.सदैव आपल्या कार्याशी तत्परता,कार्यात एकाग्रता,ग्रामस्थांच्या मदतीला सदैव उपलब्ध असणारा अधिकारी म्हणून त्यांचा नाव लौकिक आहे.एक शासकीय अधिकारी कसा असावा याचे उदाहरण कोणाला द्यायचे झाले तर के.के. आगाशे यांचे द्यावे लागेल.सेवेच्या आपल्या दीड वर्षात कुठलेही कारण न देता कायम कर्तव्यावर हजर असलेले के.के.आगाशे अनेक शासकीय सेवा करणारांसाठी आदर्श ठरणारे आहेत.त्यांनी आपले कार्य प्रामाणिक पणे पार पाडले आहे. त्यांच्या उत्कृष्ट कार्या बद्दल दि.६ जुन २०२५ रोजी शुक्रवारी त्यांचा सरपंच,ग्रामपंचायत अधिकारी,कर्मचारी व गावकऱ्यांच्या वतीने शाल,श्रीफळ,हार देऊन सन्मान करण्यात आला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच नवनियुक्त ग्रामविकास अधिकारी श्री.शंकर हेडगीरे यांचे पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यात आले.

# महाराष्ट्राने आदर्श घ्यावा अशा पारंपरिक पद्धतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती बोरगाव येथे साजरी

केज/प्रतिनिधी

पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त मोजे बोरगाव बू ता.केज जिल्हा बीड येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून पारंपरिक रित्या म्हणजेच अंकोलीकरांचे धनगरी ढोल पथक, ह.भ.प.गणेश महाराज मुंडे यांचे वारकरी सांप्रदायातील कला, गावातील ज्येष्ठ नागरिकांचे लेझीम, फुगडी आणि हालगी व संभळ वादन अशाकला प्रकाराने अहिल्यादेवी होळकर यांची जयंती निमित्त भव्य अशी मिरवणूक करण्यात आली.जयंतीचेसंयोजक बाबासाहेब निंगुळे गुरुजी,अशोक निंगुळे, डॉ.दिगंबर निंगुळे, आश्रुबा भूतकर,सुग्रीव निंगुळे,सुंदर होळकर, दिपक होळकर,निखिल मुसळे,चौरेसर,सोमनाथ निंगुळे,कुंडलिक निंगुळे बाळकृष्ण निंगुळे, गणेश गुरव,जगन्नाथ होळकर,गणेशहोळकर, बाळासाहेब खडके,



विजय निंगुळे फौजी, पांडुरंग मुसळे,निलेश निंगुळे,श्रीराम निंगुळे, बाजीराव मुसळे,मधुकर भूतकर,राजेंद्र निंगुळे, शिवाजी निंगुळे,विष्णू निंगुळे,विनोद गाढवे, रामभाऊ भूतकर, गोपाळ निंगुळे,हनुमंत होळकर,अशोक होळकर,गणेश निंगुळे, समाधान गाते,परमेश्वर खडके,भगवान गाते, तसेच बोरगाव ग्रामस्थ यांच्या सहकार्याने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती अतिशय उत्साहात संपूर्ण महाराष्ट्रानेआदर्श घ्यावा अशा पारंपरिक पद्धतीने करण्यात आली त्याबद्दल सर्व संयोजकांचे व गावकऱ्यांचे तसेच कार्यक्रम पूर्ण करण्यास सहकार्य करणारे गावचे सरपंच बाळासाहेब गव्हाणे,दिगंबर गव्हाणे, शशिकांत बापू गव्हाणे या सगळ्यांचे आरंभ फाउंडेशन व अहिल्या प्रबोधनी मंच यांच्या वतीने व ड.उत्तरेश्वर निंगुळे,मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजी नगर यांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानले व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.दरम्यान डिजेचा वापर न करता अतिशय सुंदर पद्धतीने पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी झाली याबद्दल बोरगाव ग्रामस्थांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सौ कल्पना पारस बोरा यांचे अल्पशा आजाराने निधन

बीड ।प्रतिनिधी

जुना नगर नाका येथील प्रतिष्ठित व्यापारी पारस शांतीलाल बोरा यांच्या पत्नी कल्पना



बोरा वय (४९ ) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन ६ जून रोजी झाले. त्यांच्या पश्चात ३ मुली व १ मुलगा असा परिवार आहे.त्यांच्या पार्थिवावर दिनांक ७ जून रोजी सकाळी १० वाजता अमरधाम, मोंढा रोड बीड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# लिंबागणेश पौलिस चौकीतील पौलिस कर्मचाऱ्यांना निरोप तर नविन कर्मचाऱ्यांचे स्वागत

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनुर पोलिस स्टेशन अंतर्गत लिंबागणेश पोलिस चौकीतील बदली झालेल्या पोलिस हेड कॉन्स्टेबल संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे,एम तांदळे यांचा पोखरी (घाट) चे सरपंच बिभीषण मुळीक,महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.०६ जुन शुक्रवार रोजी पोलिस मित्र ग्रुप लिंबागणेश यांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालय लिंबागणेश येथे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन पत्रकार हरीओम क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव यांनी केले.यावेळी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित विश्वंभर गिरी, ग्रामपंचायत सदस्य समीर शेख यांनी मनोगत व्यक्त केले तर सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी पोलिस कर्मचारी यांनी केलेल्या प्रशंसनीय कामाचा लेखाजोखा मांडत ग्रामस्थांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.नेकनुर पोलिस ठाणे अंतर्गत लिंबागणेश पोलिस चौकी मधील पोलिस हेड कॉन्स्टेबल संतोष राऊत यांची शिवाजीनगर पोलिस स्टेशन बीड,बाबासाहेब डोंगरे व नवनाथ मुंढे यांची अंबेजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तर मधुकर तांदळे यांची पाटोदा पोलिस स्टेशन येथे बदली करण्यात आली आहे. पोलिस मित्र ग्रुप लिंबागणेश यांच्या वतीने शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा आदरपूर्वक सन्मान करत जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला.यावेळी



माजी सैनिक मारोती रणखांब, सय्यद बशीर, विक्रांत वाणी,अँड.गणेश वाणी, औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, बाळु कदम,तुकाराम गायकवाड, तुळशीराम पवार,बालाजी निर्मळ, जितेंद्र निर्मळ, कृष्णा वायभट, योगेश शिंदे,केशव गिरे, आदी ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थांची उपस्थिती होती.

लिंबागणेश पोलिस चौकीतील जुन्या सर्वच कर्मचाऱ्यांची बदली झाल्याने नव्याने रूजू झालेले पोलिस हेड कॉन्स्टेबल बडे ,राख, शेलार आणि राऊत यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालय व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण मध्ये छ.शिवाजी महाराज राज्यभिषेक दिन सोहळा व जागतिक पर्यावरण दिन साजरा

केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज.जि.बीड व आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज.जि.बीड यांच्या संयुक्तविद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन सोहळा व जागतिक पर्यावरण दिन विविध सांस्कृतिक,सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.दिनांक ६ जुन २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन सोहळा व्याख्यान व चर्चासत्र कार्यक्रम घेवून साजरा करण्यात आला.प्रमुख व्याख्याते म्हणून ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ समाज सेवक,जेष्ठ विचारवंत, ख्यातनाम वक्ते, व्याख्याते डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड व एस. के.वैरागे यांचे व्याख्यान झाले.छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य, कर्तृत्व आणि नेतृत्व जगविख्यात असल्याचे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची उंची जगात कोणालाही गाठता आली नाही असे प्रतिपादन एस.के.वैरागे यांनी केले.प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, माणिकराव गायकवाड, पांडुरंग गावदवाड यांनी ही मनोगत व्यक्त केले. यावेळी संजय सोनवणे, कमलाकर साबळे, बाळासाहेब घोगले, रावसाहेब जाधव, दादासाहेब गायकवाड, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप रंगनाथ गायकवाड यांनी केला.

दिनांक ५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त व्याख्यान व परिसंवाद कार्यक्रम घेवून साजरा करण्यात आला.प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड यांचे व्याख्यान व



मार्गदर्शन झाले.अध्यक्ष स्थानी रावसाहेब जाधव हे होते.यावेळी बाळासाहेब गायकवाड, आनंद भैय्या गायकवाड संजय सोनवणे यांनीही उपस्थित राहून मार्ग दर्शन केले.दोन्ही कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन,आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे व संस्थेचे विश्वस्त आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

## Short NEWS

### शेतकऱ्यांनी पेरणीची घाई टाळावी – जिल्हा कृषी अधीक्षक

लातूर – जिल्ह्यात कापूस पिकाची ८० हेक्टरवर पेरणी पूर्ण झाली असली, तरी बदलत्या वातावरणामुळे मान्सूनच्या गतीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई न करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी शिवसांब लाडके यांनी केले आहे.

सध्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांकडून डीएपी खताची मागणी वाढली आहे. डीएपीमध्ये १८ टक्के नत्र आणि ४६ टक्के स्फुरद असते. डीएपीच्या कमतरतेमुळे पर्यायी खतांचा वापर आवश्यक आहे. यामध्ये एसएसपी (सिंगल सुपरफॉस्फेट) हा उत्तम पर्याय आहे, ज्यामध्ये १६ टक्के स्फुरद, सल्फर आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये असतात. तेलबिया पिकांसाठी एसएसपीचा वापर विशेष फायदेशीर आहे. डीएपीच्या एका गोणीऐवजी अर्धी गोणी युरिया आणि तीन गोण्या एसएसपीचा वापर प्रभावी ठरू शकतो.शेतकऱ्यांनी केवळ डीएपीवर अवलंबून न राहता बाजारात उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करावा, असे आवाहन श्री. लाडके यांनी केले आहे.

*******

### मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत महत्त्वपूर्ण बदल

लातूर – राज्य सरकारने सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायासाठी आर्थिक मदत देणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात महत्त्वाचे बदल केले असून, सुधारित शासन निर्णय बुधवारी जारी करण्यात आला. योजनेत सेवा उद्योग, कृषि पूरक व्यवसाय, ई-वाहतूक, ब्रँड आधारित विक्री केंद्रे, फिरते विक्री केंद्रे, खाद्यपदार्थ केंद्रे, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल, ढाबा, होम स्टे, क्लाऊड किचन, जलक्रीडा आणि प्रवासी वाहतुकीसाठी बोट व्यवसाय यांचा समावेश करण्यात आला आहे.

यापूर्वी अनुसूचित जाती-जमातींसाठी ५० वर्षे आणि इतर प्रवर्गासाठी ४५ वर्षे असलेली वयोमर्यादा आता पूर्णपणे हटवण्यात आली आहे. प्रकल्पाची कमाल किंमत सेवा आणि कृषि पूरक उद्योगांसाठी २० लाखांवरून ५० लाख रुपये, तर उत्पादन उद्योगांसाठी ५० लाखांवरून १ कोटी रुपये करण्यात आली आहे. अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यांना सेवा उद्योगासाठी शहरी भागात २५ टक्के (कमाल ५ लाख) आणि ग्रामीण भागात ३५ टक्के (कमाल ७ लाख) अनुदान मिळेल. उत्पादन उद्योगासाठी २५ टक्के (कमाल १२.५ लाख) आणि ३५ टक्के (कमाल १७.५ लाख) अनुदान मिळेल. इतर प्रवर्गांसाठी सेवा उद्योगात शहरी भागात १५ टक्के (कमाल ३ लाख) आणि ग्रामीण भागात २५ टक्के (कमाल ५ लाख), तर उत्पादन उद्योगासाठी शहरी भागात १५ टक्के (कमाल ७.५ लाख) आणि ग्रामीण भागात २५ टक्के (कमाल १२.५ लाख) अनुदान मिळेल.कर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना सेवा आणि कृषि पूरक उद्योगांसाठी १ आठवडा, तर उत्पादन उद्योगांसाठी २ आठवड्यांचे उद्योजकीय प्रशिक्षण अनिवार्य आहे. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्यांनाच कर्ज आणि अनुदान मिळेल. लाभार्थ्यांना ऑनलाइन किंवा ऑफलाइन प्रशिक्षण आणि प्रशिक्षण केंद्र निवडण्याची मुभा आहे. लातूर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

******

### विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग ७ जून रोजी बंद राहणार

लातूर ।प्रतिनिधी

बकरी ईदनिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग शनिवार, ७ जून २०२५ रोजी बंद राहील. तसेच रविवार, ०८ जून २०२५ रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशी बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. उद्धव माने यांनी कळविले आहे.

******

### नववी किंवा दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यास कृषी पदविकेची संधी

बीड – महाराष्ट्रात नियमित कृषि शिक्षण घेऊ न शकणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत मुक्त कृषि शिक्षण केंद्र, सौ. के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड. येथे नववी उत्तीर्ण विद्यार्थी देखील झेरॉक्स कागदपत्रावर माळी प्रशिक्षण हा एक वर्षाचा कोर्स पूर्ण करून पुढे कृषि पदविकेचे शिक्षण पूर्ण करू शकतो. कृषी शिक्षण पूर्ण केल्यानंतर अशा विद्यार्थ्यांना अनेक ठिकाणी शासकीय तसेच खाजगी नोकरीची व व्यवसायाची संधी उपलब्ध आहे. जसे की कृषी विभाग, कृषी विद्यापीठ, कृषी कंपनी तसेच स्वतःचा कृषी व्यवसाय सुरू करण्यासाठी कृषी शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. त्यासाठी सर्व परिसरातील विद्यार्थ्यांना आवाहन आहे की आपण आपला प्रवेश आजच निश्चित करा. तरी आपण ऑनलाइन नोंदणीसाठी प्रा. बी.बी. तांबोळकर किंवा प्रा. ए.पी. ढोरमारे यांच्याशी संपर्क साधावा. मो. ९८२३८२८६४५.

*********

### अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी वसतिगृह

बीड – निलज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे अनुसूचित जातीतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गिराम नगर,पांगरी रोड,बीड येथे निवासी वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. या वसतिगृहात राहण्याची , जेवणाची व ट्युशनची व्यवस्था अतिशय माफक दरात करण्यात आली आहे.वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमा बरोबरच इंग्रजी बोलणे ,नीट , जी , विविध स्पर्धा परीक्षा , शालेय स्पर्धा परीक्षा , स्कॉलरशिप , एन एम एम एस. इत्यादी परीक्षांचे तज्ञ व अनुभवी प्राध्यापकांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

## Short NEWS

### बकरी ईद निमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या शुभेच्छा

मुंबई - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ईद अल - अधा (बकरी ईद) निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत.ईद मुबारक! ईद अल - अधा (बकरी ईद) हा सण त्याग, करुणा व परोपकाराचा संदेश देतो. हा सण सर्वांच्या जीवनात सुख, शांती, सौहार्द व समृद्धी घेऊन येवो या मंगल कामनेसह सर्वांना, विशेषतः मुस्लिम बंधू भगिनींना ईद अल अधाच्या शुभेच्छा देतो, असे राज्यपाल राधाकृष्णन यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

*********

### आपत्ती काळात जनसंपर्क अधिकाऱ्यांनी माध्यमांना वस्तुनिष्ठ माहिती द्यावी - अपर जिल्हाधिकारी अमृत नाटेकर

मुंबई - आपत्तीच्या काळात जनतेपर्यंत वस्तुनिष्ठ व खरी माहिती पोहचणे अधिक गरजेचे असते. यासाठी आपत्ती काळात घडणाऱ्या सर्व घटना, आपत्ती व्यवस्थापन व मदत कार्याची वस्तुनिष्ठ माहिती संबंधित यंत्रणांकडून घेऊन प्रसारमाध्यमांद्वारे माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहचविण्याची जनसंपर्क अधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी असते.
आपत्तीच्या काळात जनसंपर्क अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क राहून प्रसार माध्यमांना वस्तुनिष्ठ माहिती द्यावी, असे आवाहन मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अपर जिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी केले.यंदाच्या पावसाळ्यातील आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्यावतीने मुंबईतील सर्व यंत्रणा व विभागांच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांची बैठक मंत्रालयात झाली. यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) हेमराज बागुल, संचालक (वृत्त व जनसंपर्क) डॉ. गणेश मुळे यांच्यासह विविध विभागाचे जनसंपर्क अधिकारी उपस्थित होते.

*********

### आपत्ती काळात जनसंपर्क अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेवर भर द्यावा - हेमराज बागुल

मुंबई - आपत्कालीन परिस्थितीत समन्वय, संवाद आणि संवेदनशीलता यावर भर द्यावा असे सांगून संचालक (प्रशासन) हेमराज बागुल म्हणाले, आपत्ती काळात जनसंपर्क अधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ माहिती देण्याबरोबरच जनतेच्या मनात विश्वास निर्माण करावा. चुकीची माहिती आणि विसंवाद शासनाची प्रतिमा मलीन करू शकते. त्यामुळे संस्थांची प्रतिमा जपण्यास प्राधान्य द्यावे, असेही श्री. बागुल म्हणाले.

*******

### अफवांचे खंडन करण्यास प्राधान्य द्यावे - डॉ. गणेश मुळे

मुंबई - आपत्तीच्या वेळी प्रशासनाच्या प्रत्यक्ष कृती आणि मदतकार्याची वस्तुनिष्ठ माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या कामाबरोबरच आपत्ती काळात पसरवल्या जाणाऱ्या अफवांचे खंडन करण्यास जनसंपर्क अधिकाऱ्यांनी प्राधान्य द्यावे, असे संचालक ( वृत्त व जनसंपर्क) डॉ. गणेश मुळे यांनी सांगितले. पुढे डॉ. मुळे म्हणाले जनसंपर्क अधिकाऱ्यांमध्ये समन्वय राहण्यासाठी आणि माहितीच्या आदान- प्रदानासाठी प्रत्येक विभागाने स्वतःचा व्हॉटसप ग्रुप तयार करावा, ज्यामध्ये समन्वय करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश असावा. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व समाज माध्यमांना तत्काळ माहिती देण्यात यावी. आपल्या कार्यक्षेत्रात अचानक धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास त्याची माहिती तत्काळ समाजमाध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचवावी, आपत्ती व्यवस्थापन पुस्तिका दरवर्षी अद्ययावत माहितीसह असावी, विशेषतः महत्त्वाचे हेल्पलाइन नंबर आणि यंत्रणांचे संपर्क तपशील याचा त्यामध्ये समावेश असावा असेही श्री.मुळे म्हणाले.

******

### जय महाराष्ट्र' कार्यक्रमात उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांची मुलाखत

मुंबई - माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या (एमएडीसी) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, स्वाती पांडे यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. हरित आणि स्मार्ट विमानतळ विकासाच्या दृष्टीने धोरणात्मक पावले उचलण्यात आली आहेत. याविषयी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात श्रीमती पांडे यांनी माहिती दिली आहे.'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि. १० जून २०२५ रोजी दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर रात्री ८.०० वा. प्रसारित होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवर खाली दिलेल्या लिंकवरून ही मुलाखत पाहता येणार आहे. निवेदक हेमंत बर्वे यांनी ही मुलाखत घेतली आहे.
यावेळी उल्हासनगर महापालिकेचे उपायुक्त अजय साबळे, मुंबई दूरदर्शनच्या उपसंचालक संगीता गोडबोले, ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, आकाशवाणीचे सहायक संचालक डॉ.संतोष जाधव, सहायक संचालक (माहिती) इर्शाद बागवान यांनीही विविध सूचना मांडल्या.

# पहिल्या महिला पो. नि. वर्षा शिंदे यांचा पत्रकारांनी केला सत्कार

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी पोलीस ठाण्याला लाभलेल्या पहिल्या महिला पोलीस अधिकारी वर्षाताई शिंदे यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणीच्या वतीने शुक्रवारी सत्कार करण्यात आला. वडवणी पोलीस ठाण्याची निर्मिती होऊन अनेक वर्ष झाले आहेत. आतापर्यंत अनेक पुरुष अधिकारी या ठिकाणी होऊन गेले आहेत. पो. नि. छबुराव सोनवणे, पो. नि. सुरेश साबळे, पो. नि. आनंद कांगुणे सारख्या अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तुत्वाने वडवणी पोलीस ठाण्यामध्ये आपल्या नावाची छाप तयार केलेली आहे. वडवणी तालुक्याला एक चांगली दिशा देण्याचे काम या तिन्ही अधिकाऱ्यांनी करून दाखवलेले आहे. त्यामुळे त्यांचं नाव तालुक्यातील सर्व सामान्य लोकांच्या तोंडात नेहमीच घेतले जाते. वडवणी पोलीस ठाण्याला अद्याप एकदाही महिला पोलीस अधिकारी लाभल्या नव्हत्या आता पहिल्यांदाच वडवणीला महिला पोलीस अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वडवणी ठाण्यामध्ये नियुक्ती होत असताना आपल्या कामाचा धडाका लावला आहे. वडवणी तालुक्याला पुन्हा एकदा चांगली दिशा देण्यासाठी त्यांनी कामाची धडाडी सुरू केली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणीच्या वतीने त्यांचा पोलीस ठाण्यात जाऊन झाड, पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष विनायक जाधव, तालुकाध्यक्ष वास्तवचे मुख्य उपसंपादक अशोक निपटे, डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष सतीश मजमुले, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. श्रीनिवास काकडे, तालुका उपाध्यक्ष शांतिनाथ जैन, सचिव अर्जुन मुंडे, पत्रकार ज्ञानेश्वर लंगे, पत्रकार अशोक फपाळ, पत्रकार शंकर झाडे, पत्रकार गंगाभीष्म अंडील, पत्रकार एजाज शेख, पत्रकार अंकुश गवळी, पत्रकार विष्णू डोईफोडे, बाळासाहेब सावंत आदी पत्रकार बांधवांची व सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

पत्रकार सहकार्य करतील

वडवणी तालुक्यातील पत्रकार बांधव आणि पोलीस प्रशासनाचे मागील पंचवीस वर्षापासूनचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध राहिलेले आहेत. पत्रकारांनी नेहमीच पोलीस प्रशासनाला सहकार्य केलेले आहे. सकारात्मक बातम्या छापून पोलिसांचे मनोबल वाढवलेले आहे. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी तालुक्यामध्ये चांगलं काम केलं त्यांचा गौरवच पत्रकारांनी केलेला आहे. यापुढेही आम्ही सहकार्य करत राहू अशी ग्वाही पत्रकार संघाच्या वतीने तालुका अध्यक्ष अशोक निपटे यांनी पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे यांना दिली.



# शिवराज्याभिषेक दिन फक्त साजरा न करता छत्रपती शिवाजी महाराजांचे विविध

## गुण युवकांनी आपल्या अंगी उतरावेत - आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

आ. सुरेश धस पुढे म्हणाले, बेरोजगारीच्या समस्येवर कौशल्य शिक्षण हाच उपाय असल्याचा प्रभावी संदेश दिला. त्यांनी युवकांना व्यवसायाच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहनही यावेळी केले. शिवराज्याभिषेक दिन फक्त साजरा न करता छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध गुण युवकांनी आपल्या अंगी उतरवावेत, प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन आपल्या आईवडिलांचे स्वप्न साकार करावेत. सार्वजनिक संपत्तीचे व पर्यावरणाचे रक्षण करावे, शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली व प्रागतिक राज्य उभे केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली स्वतःची अशी युद्धनीती विकसित केली जी गनिमी कावा म्हणून ओळखली जाते.

कार्यक्रमात कुमारी शिवकन्या सौंदनकर हिने आपल्या ऑन - जॉब ट्रेनिंगचा अनुभव शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रबोधन निकाळजे यांनी सोशल मीडियापासून दूर राहून युवकांनी कौशल्य शिक्षणाकडे लक्ष देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे यांनी शिवराज्याभिषेकाचा इतिहास सांगत त्याचा सण म्हणून महत्त्व विशद केले. त्यांच्या मनोगताच्या शेवटी त्यांनी स्वदेशी वस्तू वापरण्याचा प्रेरणादायी संदेश दिला.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी तंत्र प्रदर्शनाला भेट देत प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रकल्पांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयटीआयचे प्राचार्य गणेश हडतगुणे यांनी केले तर सूत्रसंचालन एम. जी. पवार सर यांनी प्रभावीपणे पार पाडले. या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये नगराध्यक्ष जिया बेग, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, अशोक जीबकाटे, अँड. प्रबोधन निकाळजे, अक्षय शिरस्वाल, कैलास रेडेकर, गणेश शिंदे, गौतम आजबे, विनोद रोडे, सुनिल सानप, नितेश कर्डुले सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# तरनळी येथे शिव स्वराज्य दिन उत्साहात साजरा

केज/प्रतिनिधी

दि.६ जुन २०२५ शुक्रवार रोजी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन केले तसेच ध्वजारोहण करण्यात आले व शिव स्वराज्य दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमास सरपंच श्री.महादेव प्रताप खेडकर,उप सरपंच शिवाजी मोहिते, ग्रा.पं.सदस्य,गावकरी,ग्रामविस्तार अधिकारी श्री नागरगोजे साहेब, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज जि.बीड या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम,शिक्षक,शिक्षिका वृंद,विद्यार्थी उपस्थित होते.हिंदुस्थानचेआराध्य दैवत राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५० वर्षांपूर्वी दि.६जुन १६७४ रोजी राज्याभिषेक करण्यात आला.हा राज्याभिषेक करुन त्यांना छत्रपती ही पदवी बहाल करण्यात आली.दरवर्षी रायगडावर या दिवशी शिव राज्याभिषेक सोहळा अत्यंत जल्लोषात व उत्साहात साजरा केला जातो.हा दिवस सोनेरी मानला जातो.अशी माहिती जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. शेवटी उपस्थितांचे आभार मानुन कार्यक्रम संपन्न झाला.

# १० वी आणि १२ वी उत्तीर्ण गुणवंतांचा आ.सुरेश धस मित्रमंडळातर्फे होणार गौरव

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील यावर्षीच्या १० वी आणि १२ वी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा आ. सुरेश धस मित्र मंडळ यांचे वतीने गुणगौरव समारंभ रविवार दि. ८ जून २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता अनिषा ग्लोबल इंग्लिश स्कूल या ठिकाणी होणार आहे.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे. दरवर्षी इ. १० वी आणि १२ वी इयत्ता उत्तीर्ण गुणवंतांचा सत्कार आ. सुरेश धस मित्र मंडळाचे वतीने होत असतो. त्याप्रमाणे यावर्षी देखील या गुणवंतांचा सत्कार करून इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने



समारंभाचे आयोजन करण्यात आले असून सर्व पालकांनी आणि संबंधित विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# माजी सभापती केशवराव (बापुराव) गर्जे यांचे निधन

आष्टी (प्रतिनिधी)

थोर स्वातंत्र्य सैनिक स्व. रामराव गर्जे भाऊ यांचे कनिष्ठ चिरंजीव, आष्टी पंचायत समितीचे माजी सभापती बापुराव उर्फ केशवराव रामराव गर्जे यांचे गुरुवार दि. ५ जुन रोजी सायंकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अहिल्यानगर येथील नोबेल हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्यांच्यापाठीमागे पत्नी माजी सभापती अंजलीताई गर्जे, दोन मुले, खुशालराव गर्जे हा एक भाऊ, पुतणे, सुना असा मोठा परिवार आहे.



पाटसरा येथे शुक्रवारी सकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आला. यावेळी अशोक गर्जे, दिलीपराव काळे, माजी सभापती लक्ष्मण नन्नवरे, ड. हनुमंत थोरवे, शिवाजी नाकाडे, चेअरमन आदिनाथ सानप, लालाभाऊ कुमकर, भाऊसाहेब लटपटे, संजय गाढवे, पांडुरंग नागरगोजे, माजी सभापती अनिल जायभाये, पत्रकार उत्तम बोडखे, वैजीनाथ मिसाळ, समाजसेवक विजय गोल्हार, देविदास आबा धस, माजी आ. भीमराव धोंडे यांनी श्रध्दांजली अर्पण केली.

यावेळी माजी आ. भीमराव धोंडे, देविदास आबा धस, डा. अजय दादा धोंडे, वैजीनाथ मिसाळ, समाजसेवक विजय गोल्हार, ड. हनुमंत थोरवे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, विठ्ठलराव बन्सोडे, लालाभाऊ कुमकर, आण्णासाहेब चौधरी, चेअरमन आदिनाथ सानप, शिवाजी नाकाडे, रामभाऊ खाडे, भाऊसाहेब लटपटे, संजय गाढवे, सेवानिवृत नायब तहसिलदार शहादेव गिते, विष्णुपंत वायभासे, दिलीपराव काळे,पत्रकार उत्तम बोडखे, अशोक गर्जे, माजी सभापती लक्ष्मण नन्नवरे, एन. टी. गर्जे, संभाजी झांबरे, प्राचार्य डा. डी. बी. राऊत, प्रा. सुभाष नागरगोजे, श्रीमंत सोनवणे, राजेंद्र लाड, सोनवणे फौजी, शेषराव गर्जे फौजी, रावसाहेब लोखंडे, शिवाजी गर्जे, माजी सभापती बाबासाहेब अंधाळे, कल्याण काकडे, वाय. आर. गर्जे, संजय मिसाळ, दादा जगताप, स्वप्निल घुले, अशोक लटपटे, बाबा गर्जे आदि राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिनानिमित्त मान्यवरांचे व्याख्यान

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शुक्रवार, दिनांक ६ जुन रोजी शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे व्हिडिओद्वारे ऑनलाईन उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते बिपिनदादा क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर प्रमुख वक्ते तथा सामाजिक कार्यकर्ते गुरूगोविंद सोन्नर यांनी 'स्वदेशी विचारांचा प्रसार' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची संकल्पना महाराष्ट्र राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री ना.मंगल प्रभातजी लोढा मंत्री यांची होती. उद्घाटनानंतर कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा (भा.प्र.से.) यांनी ऑनलाईन व्हिडिओद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरूवात कौशल्य गीताने झाली. तर प्रास्ताविक शिल्प निदेशक रामदास वैरागे यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी बिपिनदादा क्षीरसागर



यांनी ही अत्यंत मौलिक असे मार्गदर्शन केले. तर प्रमुख वक्ते गुरूगोविंद सोन्नर यांनी शिवाजी महाराज यांच्या कार्याविषयीची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटनिदेशक श्रीमती एस.ए.क्षीरसागर या होत्या. तसेच विचारमंचावर आयएमसी मेंबर बनसोडे व शिल्प निदेशक श्रीमंत ओव्हाळ हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास होळीकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार श्रीमंत ओव्हाळ यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे प्राचार्य पी.टी.मुने यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेतील विजय साबळे, भरत म्हेत्रे, राहुल माशाळकर, अमित लोमटे यांच्यासह सर्व शिल्प निदेशक व सर्व तासिका निदेशक तसेच शिल्प निदेशक भाग्यश्री पाटील, शिल्प निदेशक सुवर्णा गवळी, भांडारपाल अभय पोटपल्लेवार अभय, सिनियर क्लार्क निलेश म्हातारमारे, हेड क्लार्क रमेश धस व इतर सर्व कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमासाठी संस्थेतील सर्व आजी - माजी प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# वनामकृविच्या सामुदायिक विज्ञान महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

## प्लास्टिक प्रदूषण रोखणे ही प्रत्येकाची जबाबदारी!-डॉ जया बंगाळे

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या सामुदायिक विज्ञान महाविद्यालयात दिनांक ५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिन अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावर्षीच्या प्लास्टिक प्रदूषणाचा पराभव करा (बीट प्लास्टिक पोल्यूशन ) या जागतिक घोषवाक्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमात सहयोगी अधिष्ठाता डॉ जया बंगाळे यांचे यावर्षीच्या संकल्पनेवर आधारित जागृतीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.




मार्गदर्शनात त्यांनी प्लास्टिकचा अतिरेक आणि त्याचे जलचर, प्राणी,वन्यजीव तसेच मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम गंभीर पातळीवर पोहोचल्याची उपस्थितांना जाणीव करून दिली .दरवर्षी कोट्यवधी टन प्लास्टिक समुद्रात आणि जमिनीवर टाकले जात असल्याने नैसर्गिक परिसंस्थांवर मोठे संकट निर्माण करत असल्याचे विशद केले. त्यांनी स्लाईड शो द्वारे पर्यावरणाच्या सद्यस्थितीचे चिंताजनक वास्तव मांडत, पृथ्वीवरील पर्यावरणावर होत असलेल्या ऱ्हासाचे भीषण परिणाम, वाढती नैसर्गिक आपत्ती, हवामानातील असंतुलन आणि मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण झालेले संकटे यावर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि प्रभावी भाष्य केले. त्यांनी एकल वापर (सिंगल यूज )लास्टिकच्या विविध वस्तू वापरण्यास नाही असे ठामपणे म्हणायला शिका असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर पुरी यांनी केले. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या भित्तीपत्रकांमधून पर्यावरण रक्षणाचे जाणीवपूर्वक संदेश दिले. 'प्लास्टिक मुक्त परिसर' ही शपथ घेतली गेली, तसेच परिसरात वृक्षारोपण करून प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

याप्रसंगी डॉ. वीणा भालेराव यांच्या समवेत महाविद्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचचे आयोजन इव्हेंट मॅनेजमेंट विषयाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रात्यक्षिकाचा भाग म्हणून प्रा. ज्योती मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश पर्यावरण दिन फक्त एक दिवसापुरता न ठेवता, पर्यावरणपूरक जीवनशैली अंगिकारण्याचा संकल्प करण्यावर भर देण्यात आला. या उपक्रमातून भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित आणि शाश्वत पर्यावरण निर्माण

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पाथर्डी मध्ये सायकल रॅलीचे आयोजन

अहिल्या नगर/जिल्हा प्रतिनिधी

पर्यावरण जागरूकतेसाठी सायकल रॅलीचे आयोजन जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आज आपल्या पाथर्डी शहरात संध्याकाळी ५:३० ते ७:०० या वेळेत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. विविध क्षेत्रातील लोकांनी पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी या रॅलीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. हा उपक्रम पर्यावरण जागरूकता वाढवण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरला. या रॅलीची सुरुवात पाथर्डी तालुक्यांचे पोलिस निरिक्षक संतोष मुटकुळे यांच्या हस्ते करण्यात आली. सहभागी झालेल्यांनी पर्यावरण वाचवा - प्रदूषण हटवा अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण परिसर उत्साहाने दनानून टाकला. रॅलीच्या मार्गात नागरिकांना पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या महत्त्वाची जाणीव करून देण्यात आली.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सामाजिक कार्यकर्ते डॉ. दीपक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. पोलिस निरिक्षक संतोष मुटकुळे, हरिहर गर्जे, डॉ. दीपक देशमुख यांनी आपल्या भाषणात पर्यावरण संवर्धनाच्या आवश्यकतेवर भर दिला आणि



उपस्थितांना प्रेरणा दिली. यावेळी डॉक्टर विनय फड, निर्हाली सर, बांगर सर, कोंडीराम बोरुडे, प्रदीप बोडखे, विजय पवार, हुमायून आतार, राजेंद्र काळे, लोखंडे तसेच या मान्यवर व्यक्तींनी आपली उपस्थिती नोंदवून रॅली मध्ये सहभाग नोंदवला.

रॅलीच्या समाप्तीनंतर पर्यावरण रक्षणासाठी विविध उपक्रमांबद्दल माहिती देण्यात आली. सहभागी नागरिकांनी स्वच्छता राखणे, कचरा व्यवस्थापन करणे, पाण्याचा जपून वापर करणे आणि वृक्षारोपण याबद्दल शपथ घेतली. या उपक्रमामुळे समाजामध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या विचारांची रुजवणूक होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.रॅलीची संपूर्ण मांडणी सुंदर आणि शिस्तबद्धपणे झाली होती. अनेक सामाजिक संस्था व स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाला पाठिंबा दिला. या उपक्रमामुळे शहरात पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक बळकट होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.सदर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सुखदेव मर्दाने यांनी केले होते.

# परभणी जिल्हा परिषदेत शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा

पालकमंत्री ना. मेघना दीदी बोर्डीकर - साकोरे यांनी दिल्या शुभेच्छा

परभणी । प्रतिनिधी

शुक्रवार दिनांक ६ जून २०२५ रोजी परभणी जिल्हा परिषदेमध्ये जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे पूजन, दीप प्रज्वलन करण्यात आले तसेच उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्र ग्रंथाचे वितरण करण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या हस्ते शिवशक राजदंड स्वराज्यगुढीची उभारणी देखील करण्यात आली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश यादव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन कवठे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) रेखा काळम, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सुनील पोलास, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) दिनकर घुगे, कार्यकारी अभियंता (बांधकाम) डी एस उडाणशिवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नामदेव आघाव, समाज कल्याण अधिकारी सरस्वती




भोजने, प्रभारी जिल्हा जलसंधारण अधिकारी ऋतुजा सुपेकर यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

पालकमंत्री ना. मेघना दीदी बोर्डीकर - साकोरे यांनी दिल्या शुभेच्छा

परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.ना. मेघना दीदी बोर्डीकर - साकोरे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना शिवराज्याभिषेक दिनाच्या ध्वनी संदेशा द्वारे शुभेच्छा दिल्या तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजहित आणि राष्ट्रहितासाठी एकत्र येण्याचे आवाहन देखील केले.

छत्रपती शिवरायांनी प्रतिकूल परिस्थिती मध्ये स्वराज्याची उभारणी केली. जातपात न मानता बारा बलुतेदारांना सोबत घेऊन त्यांनी अनेक लढाया जिंकल्या, किल्यांची उभारणी केली, महिलांना सन्मान मिळवून दिला. अत्यंत कमी कालावधीत त्यांनी आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले.

रघुनाथ गावडे

जिल्हाधिकारी,परभणी.

यावेळी कार्यक्रमाचे नियोजन सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश यादव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संवाद तज्ज्ञ ज्ञानेश्वर गायकवाड यांनी केले तर उपस्थितांचे आभार कनिष्ठ प्रशासन अधिकारी मनोज कन्नावार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# परभणी जिल्हा परिषदेत शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

## पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिल्या शुभेच्छा

परभणी । प्रतिनिधी

शिवराज्याभिषेक दिन जिल्हा परिषदेमध्ये आज उत्साहात साजरा करण्यात आला. पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी ध्वनी संदेशाद्वारे शिवराज्याभिषेक दिनाच्या जनतेला शुभेच्छा दिल्या. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजहित आणि राष्ट्रहितासाठी एकत्र येण्याचे आवाहन देखील केले.



तर, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवरायांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्वराज्याची उभारणी केली. जातपात न मानता बारा बलुतेदारांना सोबत घेऊन त्यांनी अनेक लढाया जिंकल्या, किल्यांची उभारणी केली, महिलांना सन्मान मिळवून दिला. अत्यंत कमी कालावधीत त्यांनी आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले, असे सांगितले.यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश यादव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन कवठे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) रेखा काळम, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सुनील पोलास, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) दिनकर घुगे, कार्यकारी अभियंता (बांधकाम) डी एस उडाणशिवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नामदेव आघाव, समाज कल्याण अधिकारी सरस्वती भोजने, प्रभारी जिल्हा जलसंधारण अधिकारी ऋतुजा सुपेकर यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे पूजन, दीप प्रज्वलन करण्यात आले. तसेच उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्र ग्रंथाचे वितरण करण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या हस्ते शिवशक राजदंड स्वराज्यगुढीची उभारणी देखील करण्यात आली.

कार्यक्रमाचे नियोजन सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश यादव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सूत्रसंचालन संवाद तज्ज्ञ ज्ञानेश्वर गायकवाड यांनी केले तर उपस्थितांचे आभार कनिष्ठ प्रशासन अधिकारी मनोज कन्नावार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बेटमोगरा येथील जि.प.हा.शाळेच्या सन १९९७ - ९८ मधील १० वी बॅच च्या विद्यार्थी विद्यार्थिनींचा स्नेहमिलन सोहळा उत्साहात संपन्न

## विखुरलेल्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल २७ वर्षांनंतर स्नेहमिलन



मुखेड । प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मौजे बेटमोगरा येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेतील सन १९९७-१९९८ या वर्षीतील इयत्ता १० वी बॅच च्या माजी विद्यार्थी विद्यार्थिनींचा तब्बल २७ वर्षानंतर स्नेहमिलन सोहळा रविवार दि.१ जून २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या स्नेहमिलन सोहळ्यामध्ये सन १९९७-१९९८ मधील येथील जि.प.हा शाळेच्या इयत्ता १० वी तील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. बेटमोगरा येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेमध्ये येथील शिक्षण पूर्ण करून बाहेरगावी इतरत्र मोठमोठ्या व्यवसायावर,नोकरीवर गेलेल्या विद्यार्थ्यांनी व्हाट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून एकत्र भेटायचे ठरवले. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद हायस्कूल शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी तब्बल २७ वर्षानंतर बेटमोगरा येथे आपल्या जुन्या शाळेत एकत्रित जमले. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला केवळ वर्गमित्रच नाही तर, त्यांना शिकवणार्या शिक्षकांनाही आमंत्रित करण्यात आले होते.हा कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात अतिशय रंगतदार पद्धतीने पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेटमोगरा येथील श्री शिवलिंग बादशहा मठ संस्थान चे मठाधीश श्री.सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी शिक्षक, श्री.चांडोळकर गुरुजी,श्री. दमकोंडवार गुरुजी,श्री.सकिनवार सर,श्री.उकादौडे सर,श्री. भिसे सर,मठपती सर,बहिरवाड,बतकुलवार सर,योगेश्वर महाराज, श्री.मोहन मामा (माजी सेवक),मौला मामा (सेवक), इत्यादींची यावेळी उपस्थिती होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख सलीम रज्जाकसाब, संदीप शिवराज पाटील बेटमोगरेकर,यशवंत सोनकांबळे,प्रल्हाद यरपलवाड,संजय नुकुलवार,सुरेश सोनकांबळे,व्यंकट पाटील,मधुकर पिटलेवाड,बाळू ढेकळे,बाळू वाडेकर,मारोती मादाळे, शंकर तळणे सह सन १९९८ मधील १० वी च्या बॅच मधील माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनीची मोठ्या संख्येने उपस्थित होते.या स्नेहमिलन सोहळ्या दरम्यान साने गुरुजी यांच्या खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे या सुंदर कविते चे स्मरण करण्यात आले.

१ जून २०२५ चा दिवस बेटमोगरा येथील जि.प.हा.शाळेच्या सन १९९८ मधील इयत्ता १० वी.च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळ्याचा दिवस आमच्यासाठी अत्यंत आनंददायी आणि अविस्मरणीय ठरला.तसेच हा स्नेहमिलन सोहळा यशस्वीपणे पार ही पडला. आपल्या बालपणातील आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि जुन्या मित्र-मैत्रिणींसोबत पुन्हा एकदा हसण्याचा, बोलण्याचा आणि जुन्या दिवसांच्या आठवणींमध्ये रमण्याचा हा क्षण किती खास होता, हे शब्दात मांडणे कठीण आहे.

# आर पी हॉस्पिटल येथील अत्याधुनिक TMT टेस्ट युनिटचा शुभारंभ

**आता विना अँजिओग्राफी हृदयरोग निदान शक्य**

**परभणी । प्रतिनिधी**

**बदलत्या जीवनशैलीमुळे हृदयविकारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, परभणी येथील आर.पी हॉस्पिटलमध्ये नुकतेच अत्याधुनिक हृदय रोग विभाग उभारण्यात आलेला आहे, त्याचाच एक भाग म्हणून टीएमटी (ट्रेडमिल टेस्ट) युनिट सुरू करण्यात आले आहे.**

**सदरील युनिट मध्ये, अँजिओग्राफी साठी लागणारा खर्च टाळता येणार आहे, टीएमटी टेस्ट द्वारे आपल्याला ५०० रुपये मध्ये, हृदयरोग आहे किंवा नाही याचे निदान करता येणे शक्य होणार आहे, या सुविधेचा सर्वसामान्य रुग्णांना लाभ व्हावा, व त्यांच्या मनातील हृदय रोगाबद्दलची भीती कमी व्हावी, हृदयरोग कसा टाळावा आणि झाल्यास उपचार घेऊन कसे आनंदित आयुष्य जगावे यासाठी हॉस्पिटलची संपूर्ण टीम प्रयत्नशील आहे. लवकर निदानाद्वारे प्रभावी उपचार उपलब्ध करून देणे, हे येथील हृदयरोग विभागाचे प्रमुख डॉ.दीपक कुबडे यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे असे त्यांनी सांगितले. आ.डॉ.राहुल पाटील व आर पी हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबवला जात आहे.**



टेस्ट: हृदयरोग निदानाचे प्रभावी तपासणी आहे, हे हृदयाच्या कार्यक्षमतेचे शारीरिक ताण तणावादरम्यान मूल्यांकन करते. हे टेस्ट कोरोनरी आर्टरी डिसीज , अनियमित हृदयाचे ठोके (ॲरिदमिया), आणि हृदयाची ताण सहन करण्याची क्षमता तपासते. तसेच, बायपास शस्त्रक्रियेसारख्या मोठ्या ऑपरेशन्सपूर्वी हृदयाची स्थिती जाणून घेण्यासाठीही याचा उपयोग होतो.

टेस्ट हे हृदयरोग निदानाचे एक सुरक्षित, गैर-आक्रमक आणि किफायतशीर साधन आहे. हि टेस्ट हृदयाच्या धमन्यांमध्ये रक्तप्रवाह कमी होत आहे की नाही, याचा अंदाज घेते. जर ढचढ टेस्टचे परिणाम नकारात्मक (नॉर्मल) आले, तर याचा अर्थ हृदयाला पुरेसा रक्तपुरवठा होत आहे आणि इस्केमिक हृदयरोगाचा धोका नाही. अशा परिस्थितीत, अँजिओग्राफीसारख्या आक्रमक आणि खर्चिक प्रक्रियेची गरज टाळता येते. डॉ. प्रमोद शिंदे यांच्या मते लवकर निदानामुळे हृदयरोगाची जोखीम ओळखून योग्य वेळी उपचार करता येतात ज्यामुळे अँजिओग्राफीची आवश्यकता कमी होते आणि रुग्णांचा खर्च व त्रास वाचतो.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )
मराठवाडा वृत्त
शनिवार,दि.०७ जुन २०२५
SATURDAY, DT.07 JUNE 2025


## खबरदार महा ई-सेवा केंद्र चालकांनी विद्यार्थ्यांची अडवणूक केली तर गाठ शिवसेनेशी

वडवणी (प्रतिनिधी)
सध्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतींसाठी किंवा शुल्कामध्ये सवलत मिळण्यासाठी महा ईसेवा केंद्राकडून प्रमाणपत्र काढायची असतात परंतू वडवणी तालुक्यातील महा ई सेवा केंद्राकडून विद्यार्थ्यांची मोठी लूट होत आहे. असे विधार्थी व पालकाकडून सांगितले जात आहे. तरी महा इ सेवा केंद्राकडून लूट होणारी तत्काळ थांबवा नसता गाठ शिवसेनेची आहे. असा कडक इशारा शिवसेना एकनाथ शिंदे गट तालुका प्रमुख माऊली गोंडे यांनी दिला आहे.
सध्या शैक्षणिक सवलतींसाठी किंवा शिष्यवृत्तीसाठी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र सह इतर शैक्षणिक प्रमाणपत्र ही महा ई सेवा केंद्राकडून मिळतात शैक्षणिक कार्यासाठी लागणाऱ्या कागदपत्र काढण्यासाठी विद्यार्थ्यांची लूट केल्याचा प्रकार तालुक्यातील काही विद्यार्थी आणि पालक सांगत आहेत महाई केंद्र सेवा चालकाने शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांच्याकडून शुल्क आकारले जावे नसता जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली लूट करणाऱ्या महा-ई-सेवा केंद्र चालकांच्या विरोधात आंदोलन करून त्यांना धडा शिकवला जाईल असा कडक इशारा शिवसेना शिंदे एक गटाचे तालुकाप्रमुख माऊली गोंडे यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे म्हटले आहे

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मध्ये शिवराज्याभिषेक दिना निमित्त कार्यक्रम संपन्न

शिरुर कासार (प्रतिनिधी)
संत वामनभाऊ महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मध्ये शिवराज्याभिषेक दिनानिमित्त कार्यक्रम शुक्रवार (दि.६) रोजी संपन्न झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले आले मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
कौशल्य रोजगार , उद्योजकता व नाविन्याचा विभागाच्या अप्पर सचिव मनीषा वर्मा यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने पंच परिवर्तन या विषयावर मार्गदर्शन केले.
यावेळी शहरातील डॉ .संतोष सानप यांनी पंच परिवर्तन कुटुंब प्रबोधन , नागरी कर्तव्य व शिष्टाचार, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी विचार व संकल्पना, आम्ही सामाजिक समरसता याविषयी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ड . विनायक जायभाये, माजी सभापती बबन चौधरी, शिक्षक मल्हारी खेडकर, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष सोपान मोरे, पत्रकार भारतकुमार पानसंबळ, गोकुळ पवार विष्णू सव्वाशे जीवन कदम केतन पंडित, यांच्यासह कर्मचारी मिलिंद कंगळे सुवर्णा बागडे ,संगीता बडे , नेहा कुबेर ,अक्षय गीते , रावसाहेब कुटे,राजेंद्र विघ्ने , आबा खोले , यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता राज्यगीताने करण्यात आली.

## परिवहन महामंडळा'चे उत्पन्न वाढवा - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध शहरांमध्ये बसस्थानक व बस आगार परिसर स्वरुपात जागा आहेत. अशा जागांचा विकास करून महामंडळ उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करू शकते. पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) पद्धतीने अशा जागांचा व्यावसायिक स्वरूपात विकास करण्यात यावा. यामधून महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यात यावे, अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.एस.टी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयातील सभागृहात महामंडळाच्या जागांचा व्यावसायिक स्वरूपात विकास करण्यासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीस महामंडळाचे महा व्यवस्थापक (स्थापत्य) श्री.दिनेश महाजन, वास्तुविषारद श्री. लहीवाल आदी उपस्थित होते.

## सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन प्रशिक्षण सत्राचे आयोजन

मुंबई - सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन, सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचलन याविषयी प्रशिक्षण सत्राचे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र वर्सोवा येथे दि. १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी दारिद्र्य रेषे खालील प्रशिक्षणार्थींसाठी १०० रुपये आणि दारिद्र्य रेषेवरील प्रशिक्षणार्थींसाठी ४५० रुपये प्रतिमहिना शुल्क आकारण्यात येते. या प्रशिक्षणासाठी दि. २० जून २०२५ रोजी पर्यंत अर्ज करता येणार आहे.प्रशिक्षणासाठी पात्रता निकष पुढीलप्रमाणे :- प्रशिक्षणार्थी क्रियाशील मच्छिमार व प्रकृतीने सदृढ असावा, त्याचे वय १८ ते ३५ दरम्यान असावे, पोहता येणे आवश्यक आहे. शिक्षण किमान चौथी पास असावे, मासेमारीचा किमान दोन वर्षांचा अनुभव, प्रशिक्षणार्थी बायोमेट्रीक कार्ड/ आधारकार्ड धारक असावा, विहित नमुन्यातील अर्ज असावा व त्यासोबत मच्छिमार संस्थेची शिफारस असावी.

# अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी बीडवासियांकडून प्रेम शुभेच्छांचा वर्षाव!

## लाडक्या बहिणींकडून पंचवन्न दिव्यांनी औक्षण; कलाकारांनी रांगोळीतून साकारले अनिलदादांचे प्रतिबिंब

बीड, प्रतिनिधी- शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळयादिनी जिल्हाभरातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मंडळींनी एकत्रित येऊन अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा जल्लोषात साजरा केला. अनिलदादा जगताप यांनी सर्व शिवसैनिकांना बॅनरबाजी नको, गरजवंतांना मदतीचा हात द्या असे अहवान केले होते. काल दि. ४ जून रोजी अनिलदादांच्या अहवानाला प्रतिसाद देत शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी मिळून विविध ठिकाणी वृक्षारोपण, अन्नदान, अनाथ आश्रमात किराणा वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, रेनकोट वाटप, गोरगरीब महिलांना साड्या वाटप तसेच रक्तदान शिबीर अशी विविध सामाजिक उपक्रम राबवत अनिलदादा जगताप यांचे अभिष्टचिंतन केले. तसेच बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सायं ५.०० वाजल्यापासून ते उशिरा रात्रीपर्यंत बीड जिल्ह्यासह बाहेरच्या जिल्ह्यातून देखील अनिलदादा जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मित्रपरिवार मोठ्या संख्येने येत होता.

लाडक्या बहिणींनी पंचवन्न दिव्यांनी केले अनिलदादांचे औक्षण

अनिलदादा जगताप यांच्या निवासस्थानी असंख्य महिला-भगिनींनी एकत्रित येऊन पंचवन्न दिव्यांनी अनिलदादांचे औक्षण केले. विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमांनी अनिलदादा यांचा वाढदिवस साजरा होत असताना महिला-भगिनींनी अनिलदादांचे पंचवन्न दिव्यांनी केलेले औक्षण अभिष्टचिंतन सोहळ्यातील एक भावनिक क्षण ठरला.

बीड कलाकारांच्या अद्भुत कलाकृतीतून अनिलदादांचे अनोखे अभिष्टचिंतन!

बीडमधील कलाकारांनी एकत्रित येऊन रांगोळीच्या विविध रंगातून अनिलदादा जगताप यांची हुबेहूब प्रतिमा साकारत अनिलदादांचं अनोखे अभिष्टचिंतन केले. अनिलदादांच्या वाढदिवसाच्या दिनी बीडमधील सुप्रसिद्ध रांगोळीकार अंजलीताई खोबरे यांनी अनिलदादा जगताप यांची साकारलेली रांगोळी वाढदिवसाचे मुख्य आकर्षण ठरले.



## पावसाळ्या पूर्वी शहरातील नालेसफाई व स्वच्छतेचे काम पूर्ण करा - सुहास पाटील

बीड (प्रतिनिधी) काही दिवसापूर्वी बीड मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे बीडकरांची तारांबळ उडाली अनेकदा शहरातील मुख्य व गल्लीतील रस्ते जलमय झालेले पाहवयास मिळाले होते. नगर पालिका प्रशासन नालेसफाई करत नसल्यानले पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी बीड शहर सतत जलमय होत आहे. येणाऱ्या काळात मान्सूनचे पाऊस होणार आहेत अशा वेळी बीड शहर जलमय होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने तात्काळ बीड शहरात मान्सून पूर्व नालेसफाई आणि स्वच्छतेचे काम पूर्ण करावेत असे पत्रकात शिवसंग्राम शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी म्हटले आहे.



बीड नगरपालिकेने पावसाची चाहूल लागण्याआधीच संपूर्ण शहरातील नालेसफाईची कामे अत्यंत तातडीने पूर्ण करणे गरजेचे आहे . अवकाळी पावसाने नदी -नाले एक झाले . महाराष्ट्रात सात जूनच्या नंतर मान्सूनचे आगमन होत असते. नगरपालिकेने जलदगतीने पावले उचलून नालीसफाईसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा आढावा घेत संपूर्ण शहरातील नालीसफाई पूर्ण करणे गरजेचे आहे. थोड्या पावसानेच रस्त्यावर पाणी येते आणि गोरगरिबांच्या घरात शिरते . साचलेल्या पाण्यामुळे बीडचे चिखलबीड होऊन जाते . १५ जूनला शाळा सुरू होत आहेत . त्यामुळे पावसाळ्याआधीच शहर स्वच्छ झाले तरच पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होईल आणि शहराचे चिखलबीड होण्यापासून वाचवता येईल तसेच नगरपालिका प्रशासनाने नालीसफाईसाठी नियुक्त केलेल्या कामगाराचा आढावा घेतलेला आहे काय ? पावसाची चाहूल लागण्याआधीच ही कामे पूर्ण झाली पाहिजेत. तेव्हा लवकरात -लवकर नगरपालिका प्रशासनाने नालेसफाईची आणि स्वच्छतेचे काम पूर्ण करावीत आणि नागरिकांच्या घरात पाणी गेल्यास नगर परिषद प्रशासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शिवसंग्रामचे शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी नगर पालिका प्रशासनाला केली आहे .

## महायुती सरकारच्या फसव्या घोषणेच्या विरोधात शिवसेनेचे क्या हुवा तेरा वादा आंदोलन - उल्हास गिराम

बीड प्रतिनिधी
राज्यात सत्ता मिळवण्यासाठी महायुती सरकारने निवडणूक प्रचारात अनेक फसव्या घोषणांचा पाऊस पाडला होता, पण सत्ता मिळताच या घोषणांकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले.
महायुती सरकारच्या या फसवेगिरीचा जाब विचारण्यासाठी शिवसेनेचे ५ जून ते १२ जून पर्यंत क्या हुवा तेरा वादा असा प्रश्न करून गेंड्याची कातडी पांघरलेल्या महायुती सरकार ला जाब विचारणार असल्याचे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हटले आहे.



गेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून शेतकरी सन्मान योजनेतून १५ हजार रुपये देऊ, लाडक्या बहिणींना १५०० रुपयात वाढ करून २१०० रुपये देऊ, शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील डब्बढ अनुदानाच्या स्वरूपात परत करू, वृध्द पेन्शन धारकांना २१०० रुपये देऊ, शेतीला २४ तास वीज पुरवठा करू, शेती मालाला परवडेल असा हमीभाव देऊ, बी बियाणे आणि खताचे भाव कमी करू, अशा प्रकारच्या अनेक फसव्या घोषणा करून महायुती ने शेतकऱ्यांची मते लाटली, सत्ता मिळताच सोयीस्कर पणे या घोषणांकडे दुर्लक्ष केले,सत्ताधारी तिन्ही पक्षांनी शेतकऱ्यांना तात्काळ कर्ज माफी देण्याची घोषणा केली होती कर्ज माफीच्या अपेक्षेत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली, या उलट शेतकऱ्यांनी ३१ मार्च पर्यंत थकबाकी भरावी असा फतवा काढला आधीच नुकसानीत आलेल्या शेतकरी अजूनही आर्थिक अडचणीत सापडला त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ झाली. गेल्या सात आठ महिन्यात जवळपास १००० शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले असले तरीही महायुती सरकार मूग गिळून गप्प बसलेले आहे . अशात सरकारने शेती मालाचे हमीभाव जाहीर केला असून त्यात सोयाबीन चा हमी भाव हा गेल्या वर्षी पेक्षाही कमी दराने जाहीर करून शेतकऱ्यांची थट्टा केली आहे. ऐक रुपयात विमा योजना ही बंद करण्यात आली असून शेतकऱ्यावर हा अन्याय आहे.

अश्या महायुती सरकारच्या फसव्या घोषणेची त्यांना आठवण करून देण्याकरिता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने क्या हुवा तेरा वादा आंदोलन सुरू करत असून या आंदोलना अंतर्गत जिल्हाधिकारी, तहसीलदार, यांना निवेदन देणे, सत्ताधारी पक्षाच्या आमदाराना क्या हुवा तेरा वादा चे निवेदन देणे, जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, यांनी पाच गावात तीन दिवस गाव बैठक घेऊन महायुती सरकारच्या फसव्या घोषणांचा पाढा वाचणे, रस्ता रोको इत्यादी आंदोलन होणार आहे तरी या आंदोलनात सर्व शिवसेना पदाधिकारी, शेतकरी, सर्व सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केले आहे.




# समाजसेवेच्या महासागरात नवा लाटांचा उठाव

## समाज कल्याण संस्थेच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त नवी प्रांतिक कार्यकारिणी जाहीर!

शिर्डी (प्रतिनिधी) - सामाजिक कार्यात अविरतपणे कार्यरत असलेल्या समाज कल्याण न्यास या संस्थेच्या २४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत शिर्डी येथील साईपालखी निवारा केंद्रात संस्थेचा भव्य पदाधिकारी मेळावा पार पडला. या वेळी राज्यभरातून हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी, सामाजिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या ऐतिहासिक मेळाव्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते संस्थेच्या नवीन प्रांतिक कार्यकारिणीची घोषणा. शिवसेना (शिंदे गट) नेते व भिवंडी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार रुपेश म्हात्रे यांची समाज कल्याण न्यासच्या प्रदेशाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

या वेळी पत्रकारिता आणि सामाजिक कार्यात अग्रणी भूमिका बजावणारे डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक यांची प्रदेश उपाध्यक्ष म्हणून तर अनुभवी नेतृत्वाचे प्रतीक असलेले नारायण मामा पाटील यांची प्रदेश कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

याशिवाय विविध जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आल्या

स्वप्निल भोईर - महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष,योगेश बेनके - महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख,संजीवन म्हात्रे - महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते,डॉ. किशोर बळीराम पाटील - प्रदेश कार्यकारिणी सदस्य,सुधीर जावळे - उत्तर महाराष्ट्र शिक्षक सेना अध्यक्ष,संजय फुलसुंदर - उत्तर महाराष्ट्र शिक्षक सेना सचिव, डॉ. मनिलाल शिंपी - उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख,शंकर खारीक - कोकण विभाग प्रदेश अध्यक्ष अशा निवडी निश्चित करण्यात आल्या. त्याचबरोबर जिल्हा व तालुका पातळीवरील पदाधिकारी देखील निवडण्यात आल्या यामध्ये ज्ञानेश्वर भोईर - ठाणे जिल्हा अध्यक्ष,विलास भोईर - ठाणे जिल्हा सचिव, शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष,प्रकाश देवळीकर - पालघर जिल्हा अध्यक्ष,मूलचंद भगत - नाशिक जिल्हा अध्यक्ष,फारुख शेख - बीड जिल्हा अध्यक्ष,समाधान पाटील - धुळे जिल्हा अध्यक्ष,महिला आघाडी पदाधिकारी पदावर सौ. नलिनी चौधरी - ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा,सौ. गायत्री महिंद्र पगार - नाशिक जिल्हा महिला अध्यक्षा एड. शुभांगी निचिते - ठाणे महिला कार्याध्यक्ष,सौ. स्वाती कांबळे - भिवंडी शहर महिला जिल्हाध्यक्ष

सौ. नलिनीताई घरत - ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष,सौ. अंजलीताई चौधरी - पालघर जिल्हा महिला अध्यक्ष यांच्या निवडी निश्चित करण्यात आल्या.या भव्य मेळाव्याचे अध्यक्षस्थान हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांनी भूषवले होते.

डॉ. सोन्या पाटील यांचा भावनिक संदेश

संस्थेचे संस्थापक धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले,

मला कुठलाही सत्कार नको, हार-तुरे, फलक नकोत. माझा वाढदिवस साजरा करायचा असेल, तर प्रत्येकाने आपल्या भागात गरजू विद्यार्थ्यांना पेन-वही द्यावी, अन्नदान करावे, सेवा करावी - हीच खरी अभिव्यक्ती आहे.डॉ. विश्वासराव आरोटे यांचे प्रेरणादायी विचार डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या भाषणात स्पष्टपणे सांगितले की, समाज कल्याण ही संस्था म्हणजे प्रत्येक कार्यकर्त्याची खरी मातृसंस्था आहे. या महान संस्थेच्या २४ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने या पवित्र साईभूमीत, समाजसेवेच्या रथयात्रेत सहभागी होणाऱ्या आपणा सर्व कार्यकर्त्यांना मी मनापासून नमन करतो.माझी आजची भूमिका ही केवळ प्रदेश उपाध्यक्ष म्हणून नाही, तर या मातृसंस्थेचा एक जबाबदार शिलेदार म्हणून आहे.